# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक २१-०२-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.</u>**

शनिवार दिनांक २१ फेब्रुवारी २०१५ रोजी (दिनांक २०-२-१५ ची तहकूब सभा-का.प.क्र .३८) मा.महापौर सौ. कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी १२-२५ वा सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त, श्री.रमेश पवार, नगरसचिव श्री.एम.ए पठाण तसेच संबधीत अधिकारी व खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
३. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
४. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
५. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
६. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
७. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
८. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
९. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१०. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
११. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१२. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१३. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
१४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१५. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश
१६. स.स.श्री.इंगळे सुरेश सांडुजी
१७. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद
१८. स.स.श्रीमती तोतला प्रिती संतोषकुमार
१९. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ
२०. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
२१. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र
२२. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये

२३. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
२४. स.स.श्री.अफसरखान यासीन खान
२५. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग
२६. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल
२७. स.स.डॉ. खान जफर अहेमद
२८. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान
२९. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर
३०. स.स.श्री.खान आगा मिया खान
३१. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल
३२. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर
३३. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे
३४. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत
३५. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे
३६. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव
३७. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव
३८. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल
३९. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड
४०. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर
४१. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव
४२. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र
४३. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर
४४. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव
४५. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश
४६. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव
४७. स.स.श्री.खान अक्रम करीम खान
४८. स.स.श्रीमती घोडेले अनिता नंदकुमार
४९. स.स.श्री.जैन विकास रतनलाल
५०. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन
५१. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने
५२. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन
५३. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव
२. स.स.श्री.मालानी प्रफुल्ल लालचंद

श्री.गजानन बारवाल : कालची तहकूब सभा घेत आहोत. विषयपत्रिकेला सुरूवात करावी.

श्री.मीर हिदायत अली :समांतर जलवाहिनी संदर्भात बैठक घेतली. या एजन्सीला देण्यात येणारी रक्कम थांबविण्यात यावी आपण व मा.पालक मंत्री यांनीही आदेशीत केले परंतु अदयाप पत्र लेखा विभागाकडे देण्यात आले नाही.वार्डात ६-७ दिवस पाणी येत नाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

श्री.खाजा शरफोद्यीन : बैठकीस मा.आयुक्त, अधिकारी नाही. माहिती कोण देणार आहे.

श्री.समीर राजूरकर :शहर अभियंता यांना बोलविण्यात यावे. तो पर्यंत हा विषय थांबविण्यात यावे.

मा.महापौर :मा.पोलीस आयुक्त यांचेकडे बैठक असल्याने शहर अभियंता उपस्थित नाही तसे पत्र माझेकडे आलेले आहे. कार्य.अभियंता श्री. कोल्हे हे उपस्थित आहे.

श्री.मीर हिदायत अली :समांतर एजन्सीला पैसे देवू नये चार वेळेस आदेशीत केले मा.पालकमंत्री यांनी आदेशीत केले. प्रशासनाने त्यावर काय कार्यवाही केली. लेखा विभागास पत्र दिले की नाही .

कार्य.अभियंता(पापू) :मा.महापौर यांनी आदेश केले त्यानुसार लेखा विभागास कळविले जाईल.

मा.महापौर :परवा बैठक झाली त्यातही सुचना केल्या की ५ कोटी रू. थांबवून त्यातून आपल्या अधिकाऱ्यांनी कामे करण्याचे व नंतर वजा करायचे.

श्री.मीर हिदायत अली :त्या रक्कमेतून काम करावे असे सुचना दिल्या असल्या तरी कंपनीला रक्कम ही डायरेक्टर त्यांचे खात्यावर जमा होते. अशी अडजेस्टमेंन्ट केली प्रशासनाने लेखा विभागास पत्र का दिले नाही.

मा.उपमहापौर :परवाच्या बैठकीत व कालही मा.महापौरांनी आदेशीत केले जी कामे कंपनी करीत नाही ती प्रशासनाने करावी व ती रक्कम कंपनीला देण्यात येणा-या रक्कमेतून वजा करावी.

श्री.मीर हिदायत अली :लेखा विभागाला पत्र दिले तर ती रक्कम थांबेल व त्यातून कामे करता येतील.अद्याप प्रशासनाकडून पत्र दिले नाही.

मा.महापौर : श्री.कोल्हे नोंद करुन घ्यावे आजच्या आज लेखा विभागाला कंपनीची रक्कम थांबविण्या संदर्भात पत्र देण्यात यावे त्याची प्रत माझ्याकडे पाठवावी.

श्री.मीर हिदायत अली :कंपनीवर कार्यवाही होत नाही. हे सर्व दाखविण्यासाठी होत आहे पेपरला येते. कोणतेही विकास काम कंपनी करीत नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :मा.उध्दवजी ठाकरे यांचे संकल्पनेतून मराठवाडा मुक्तीसग्राम संग्रहालय सिध्दार्थ उद्यान मध्ये झाले. त्यासाठी मा.खासदार श्री.चंद्रकांतजी खैरे तसेच मा.राजकुमारजी धूत तसेच मा.पालक मंत्री यांनी निधी उपलब्ध करून दिला. परंतु प्रशासन संग्रहालयासाठी दुर्लक्षीत असून सायकांळी

५ वाजता ते बंद होते जनतेला ते पाहण्यास मिळावे व मराठवाडयाचा इतिहास कळावा. यासाठी उद्यान जोपर्यत चालू आहे तोपर्यत संग्रहालय प्रवेशासाठी खुले असावे.

श्री.समीर राजूरकर :उद्यानची वेळ जोपर्यत आहे तोपर्यत हे संग्रहालय चालू असावेच. केंव्हा उघडेल व बंद होईल, सुट्टी कधी असेल,देखरेख करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावे.

श्री.रेणुकादास वैद्य :वेळा निश्चित करून पेपरला जाहीर प्रगटन दयावे तेथे जबबादार अधिकारी नेमावे.

मा.महापौर :जोपर्यत उद्यान चालू असते तोपर्यत हे संग्रहालय नागरीकांना पाहण्यासाठी तसेच मराठवाडयाचा इतिहास काय आहे हे जाणून घेण्यासाठी खुले असावे. तेथे एक जबाबदार कर्मचारी नेमावे. सायकांळी ८ वाजेपर्यत चालू असावे.

श्रीमती प्रिती तोतला :हर्सुल तलावाचे पाणी बंद झाले अशी बातमी पेपरला आहे.गुंलमंडी व इतर वार्डात ४ दिवसाआड पाणी येते यासाठी काय नियोजन केले.

श्रीमती साधना सुरडकर:काल शटडाऊन होते त्यामुळे सकाळी ४ ते ९ दरम्यान येणारे भागात पाणी आले नाही. पुढच्या टप्प्याच्या दिवसाला पाणी येईल म्हणजे साधारणतः आठ दिवसानंतर पाणी येणार असे सांगण्यात येते. सत्य परिस्थिती काय सांगावे.

श्री.खाजा शरफोद्यीन : आश्रम पासून रेल्वेस्टेशन पर्यत पाण्याचे लाईन मोठी गळती आहे ४ वार्डास पुरेल इतके पाणी नाल्यातून वाहत जाते. हे लिकिजेस बंद करावे सहा महिण्यापासून मागणी करीत आहे.

श्रीमती सावित्री वाणी :पडेगाव भागात आठ दिवसापासून पाणी नाही. पाण्याची लाईन टाकण्याचे काम मंजूर असतांना होत नाही.

श्री.महेश माळवतकर :एन-५-एन-७ टाकीमध्ये पाणी आले नाही सिडको हडको भागातून पाणीपट्टी जास्त वसुल होते. असे असतांना तेथील नागरीकांना पाणी नाही टाक्या भरल्या जात नाही अधिकारी कर्मचारी यांना रात्री ११-३० वाजता फोन केला असता फोन उचलत नाही फारोळा येथुन ८ वाजता पाणी सोडले तरी टाक्या का भरल्या नाही.

कार्य.अभियंता(पापू) :स.सदस्य श्री. किशोर नागरे यांचेशी बोलणे झालेले होते.

मा.महापौर :ज्या भागात पाणी मिळाले नाही गॅप पडला तर तेथे टॅंकरने व्यवस्था करावी.

कार्य.अभियंता(पापू) :अशा वेळी त्या भागात मागणी केल्यानंतर टॅंकर दिले जाईल.

डॉ.जफर खान :श्री.कोल्हे एकच अधिकारी सर्व काम बघू शकत नाही. या विभागातील उपअभियंता यांचेवर जबाबदारी टाकावी, ते कोणते काम करतात.

श्री.नागरे किशोर :पडेगाव भागात पाणी का दिले जात नाही.

कार्य.अभियंता(पापू) :या भागात पाणी टॅंकरद्वारे सुरू केले आता विहिरीत पाणी टाकण्याचे आदेशीत केले आहे.

मा.उपमहापौर :शहर अभियंता उपस्थित नाही. विनंती की सोमवारी मा.महापौर यांनी त्यांचे कॅबीनमध्ये पाणीपुरवठया संबधी बैठक बोलवावी व सर्व प्रश्न मार्गी लावावे.

श्री.रेणुकादास वैद्य :पाण्याची गंभीर समस्या आहे. पिण्याचे पाणी मिळत नाही सभेला मा.आयुक्त उपस्थित का नाही प्रश्नाची उत्तर कोण देणार आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :बाजूच्या वार्डात पाणी येते माझ्या वार्डात शंभुनगर भागात पाणी येत नाही. असा भेदभाव का होत आहे.

मा.महापौर :ज्यावेळी पाणी पुरवठा होणार नाही तेथे टँकरने पाणी देण्याची व्यवस्था का होत नाही.

कार्य.अभियंता(पापू) :एकूण २७ टँकर सुरू आहे. हर्सुल तलावातील पाण्यासाठी पंप सुरू केले तेही पाणी देणार आहात.

श्री.मीर हिदायत अली :शहागंज येथील टाकीत पाणी येत नाही. त्यामुळे बाजूच्या भागात ४ दिवसाआड पाणी मिळते जाणूबजून करण्यात येते. दोन दिवसा आड पाणी का दिले जात नाही.

डॉ.जफर खान :माझ्या वार्डात ६ दिवसापासून पाणी येत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :हर्सुल तलावातील पाणी संपणार आता ५ दिवसाआड पाणीपुरवठा होणार असे वृत्तपत्रात आले ही बातमी सत्य आहे का ?

कार्य.अभियंता(पापू) :हर्सुल तलावातील पाण्याची लेव्हल कमी झाली तेथील पंप सुरू केले आहे.

श्री.समीर राजूरकर :मा.आयुक्त सभेला नाही अर्धा तासापासून चर्चा होत आहे पाणी येणार की नाही उत्तर श्री. कोल्हे देत नाही. आमच्या प्रश्नाचा खुलासा कोणी करणार आहे.

श्री.प्रल्हाद निमगांवकर :शंभुनगर भागात पाणी येत नाही विचारणा केली असता पाईप लाईन सुरू होणार, अशी उत्तरे मिळतात. किमान टँकरने तरी पाणी द्यावे.

श्री.किशोर नागरे :सुकाणू समितीच्या बैठकीत मा.महापौरांनी आदेश केले त्यानुसार कामास सुरूवात व्हावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत होते.

श्री.काशिनाथ कोकाटे :जर १७० एमएलडी पाणी दररोज लागत असेल व १०० एमएलडी पाणी येते. तीन दिवस आड पाणी देत असेल तर उर्वरीत पाणी कोठे जाते याची माहिती घ्यावी.

कार्य.अभिंयंता (पापू) :टाक्या भरण्यासाठी जे प्रेशर लागते ते येत नाही.

श्री.रेणुकदास वैद्य :पाणीप्रश्न सर्वच ठिकाणी आहे हर्सुल तलाव आटला भविष्यात ही परीस्थिती आणखी बिकट होईल श्री.कोल्हे यांना सूचना करून ही समांतरवाले ऐकणार नाही. अति.आयुक्त यांना अधिकार नाही. आयुक्त उपस्थित असते तर प्रश्नाची उत्तरे मिळाली असती.मा.आयुक्त कुठे आहे माहिती घ्यावी.

मा.महापौर : मा.आयुक्त काल नव्हते. आज ही नाही. सांयकाळी शहरात येऊन जेवण करुन निघून गेले.

अति.आयुक्त :मा.आयुक्त बैठकीला गेलेले आहे.

श्रीमती सत्यभामा शिंदे :आरोग्य सेविका यांचे पाच महिण्यापासून मानधन दिलेले नाही. त्यांना सेवा करण्यासाठी पैसे नसतात.

मा.महापौर :ज्या भागात पाणी येणार नाही गॅप पडणार आहे अशा ठिकाणी टँकर व इतर पर्यायाने पाण्याची व्यवस्था करावी. बैठकीला मा.आयुक्त नाही. सोमवारी पुन्हा बैठक आयोजित करून पाणीपुरवठा बाबत आढावा घेवू तोपर्यत पाण्याची व्यवस्था करावी.

सौ.साधना सुरडकर :स्वच्छते बाबत अडचणी येतात. स्वच्छता जवान यांना फोन केला असता त्यांचे फोनचे बील न भरल्यामूळे ते बंद आहे असे समजले त्या बाबत कार्यवाही करावी.

मा.महापौर :स.सदस्यांनी सुचना केल्याप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ७४५:-**

शनिवार दिनांक २०.१२.२०१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे (का.प.क्र.-३४) आणि दिनांक २०.१२.२०१४ रोजी तहकूब होऊन सोमवार दिनांक २२.१२.२०१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव :-**

शनिवार दिनांक २०.१२.२०१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे (का.प.क्र.-३४) आणि दिनांक २०.१२.२०१४ रोजी तहकूब होऊन सोमवार दिनांक २२.१२.२०१४ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

**विषय क्रमांक ७४६:-**

सन 2015-16 या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला निश्‍चित करणे आवश्यक असल्याने मालमत्ता कराचे दर निश्‍चितीचा प्रस्ताव प्रशासनातर्फे दिनांक 12/02/2015 रोजीच्या स्थायी समिती सभेपुढे विषय क्रमांक 105 अन्वये सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावावर सभागृहात विचार विनिमय होऊन खालील प्रमाणे दुरूस्तीसह सन 2014-15 चे प्रचलित असलेले दर सन 2015-2016 या वर्षासाठी लागू करण्यास मान्यता देण्यात येऊन सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यास शिफारस करण्यात आली.

- सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे प्रत्येक वर्षाला कराचे दर वाढविण्याऐवजी नियोजनबध्द कार्यक्रम आखून शहरातील सर्व मालमत्तांचे रिव्हीजन करावे. प्रशासनाने मालमत्ता कराच्या दरात सुचविलेली वाढ संयुक्तीक वाटत नाही. त्यामुळे सन 2015-16 या वर्षासाठी सध्याच्या प्रचलित दराप्रमाणे कर आकारणी करण्यात यावी.
- उपभोक्ता शुल्क निवासी वापरासाठी 10% ऐवजी 5% आणि कमीत कमी 300/- ऐवजी 100/- रूपये आकारण्यात यावे.
- वर्ष संपल्यानंतर विलंब शुल्काची आकारणी होणे आवश्यक आहे.
- सहा महिन्याच्या थकबाकीसाठी प्रत्येक महिन्यासाठी 2% दंड प्रस्तावित केला तो चुकीचा आहे. रद्द करण्यात येतो.
- विलंब शुल्कावर देखील व्याज आकारण्यात येते ते बंद करावे.

- विलंब शुल्क चालु मागणीत बीलामध्ये समाविष्ट असते कॉम्प्युटरच्या सॉफ्टवेअरमध्ये दुरूस्ती करावी.
- धार्मिक स्थळांच्या करआकारणी संदर्भात नियमाप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**प्रशासनाचा मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षात औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता करांचे दर व मर्यादा मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ अन्वये फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१५-२०१६ मध्ये कर आकारणी करणेसाठी पूर्वीप्रमाणेच खालील निवासी, निवासेत्तर, व्यावसायीक व औद्योगीक, शैक्षणिक संस्था, भारत सरकारच्या मिळकती, मोबाईल टॉवर्स असे गट करण्यात आलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

०१. **निवासी** :- राहते घर, माहिती तंत्रज्ञान वापरासाठी असलेल्या इमारती. (महाराष्ट्र शासनाचे औद्योगीक धोरण परिपत्रक क्र.शासन निर्णय आयटीपी-०३/सीआर-३९११/आयएनडी-७, दिनांक १२-७-२००३ अन्वये माहिती व माहिती तंत्रज्ञान यासाठी मिळकतींचा वापर असल्यास त्यांच्या करात सवलत देणेसाठी डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीज, महाराष्ट्र शासन यांचे नोंदणीकृत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.)

०२. **निवासेत्तर** :- वकीलाचे कार्यालये, कर सल्लागारांचे खाजगी कार्यालये, शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्थेशी संलग्न असलेली वस्तीगृहे, स्वतंत्र वस्तीगृहे.

०३. **व्यावसायीक** :- ०१. पेट्रोलपंप व त्यास संलग्न असलेली खुली जागा, व्यावसायीक दराने खुल्या जागेचे दर वेगळे आकारले जाईल. हॉटेल्स, लॉन्स (लग्न, समारंभासाठी वापरात येणारे लॉन्स) व्यावसायीक वापरासाठी मोकळया जागा, मॉल्स, सर्व प्रकारची दुकाने, **डॉक्टरांचे क्लिनीक**, खाजगी हॉस्पीटल्स्, कमर्शीयल पेड पार्कींगसाठी व्यावसायीक दराने कर आकारण्यात येईल. तसेच ज्या इमारती व्यावसायीक वापरासाठी भाड्याने दिल्या असतील अशा इमारतीनां सुध्दा व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल. **धार्मिक स्थळाच्या जागेवर जर व्यावसायीक वापर होत असेल तर त्यास व्यावसायीक दराने कर आकारणी करण्यात येईल.**

०४. **शैक्षणिक संस्था** :- **अ)** ज्या शैक्षणिक संस्था अनुदानित आहेत. अशा शैक्षणिक संस्थांना सामान्य कर ३० टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल.

**ब)** ज्या शैक्षणिक संस्था मध्ये इंजिनियरींग कॉलेज, मेडीकल कॉलेज तसेच सर्व विना अनुदानित शाळा, कॉलेज आहेत त्यांना सामान्य कराचा दर ३७.५ टक्के व इतर कर निवासेतर दराने आकारण्यात येईल. तसेच मेडीकल कॉलेज मधील फक्त हॉस्पीटलसाठी वापर होणाऱ्या इमारतींना सामान्य कराचा दर ४५ टक्के आकारण्यात येईल.

०५. **भारत सरकारच्या मिळकती** :- मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भारत सरकार व त्यांच्या अंगीकृत असलेली कार्यालये व इतर मिळकती यांना वापरानुसार कर आकारणी करून त्यांना महानगरपालिकेतर्फे देण्यात येणाऱ्या सुविधानुसार एकूण कराच्या ७५ टक्के, ५० टक्के व ३३.३३ टक्के रक्कम सेवा शुल्क म्हणून वसूल करण्यात येईल.

०६. **मोबाईल टॉवर्स** :- टॉवरसाठी भाडयाने घेतलेल्या इमारतीतील जागेचे प्रती माह भाडे नुसार किंवा भाडेपट्टा कराराननामानुसार यापैकी जे जास्तीचे असेल त्याप्रमाणे कर आकारण्यात येईल. तसेच बी.एस.एन.एल. व इतर दूर संचार कंपनीचे स्वतःच्या जागेत मोबाईल टॉवर असल्यास अशा मोबाईल टॉवरला तळाचे क्षेत्रफळानुसार रू.११२५/- प्रती चौ.मी. प्रती महा दरानुसार कर आकारणी करण्यात येईल. तसेच अनाधिकृत टॉवर्सला मालमत्ता कराची दुप्पट शास्ती लागु राहील.

०७. **औद्योगीक** :- एम.आय.डी.सी., औद्योगीक क्षेत्र इत्यादी.

वरील संज्ञेत मोडत असलेल्या मालमत्तेस सामान्य कराचा दर खालील प्रमाणे राहील.

०८. **सामान्य करा बाबतचा तक्ता** :-

| **सामान्य कराचा प्रकार वापराप्रमाणे** | **सध्याचे सामान्य कराचे दर** | **प्रस्तावित सामान्य कराचे दर** |
|---|---|---|
| १. निवासी (उपरोक्त ‘अ’ प्रमाणे) | ३०% | ३०% |
| २. निवासेत्तर (उपरोक्त ‘ब’ प्रमाणे) | ३७.५% | ३७.५% |
| ३. व्यावसायीक (उपरोक्त ‘क’ प्रमाणे) | ४५% | ४५% |
| ४. औद्योगीक (उपरोक्त ‘ड’ प्रमाणे) | ३६% | ३६% |
| ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| ६. विना अनुदानित शैक्षणिक संस्था | ३७.५% | ३७.५% |

०९. **उपभोक्ता शुल्क** :- घनकचरा व्यवस्थापणेसाठी लागणारा खर्च शहरातील सर्व मिळकत धारकांकडुन उपभोक्ता कर म्हणुन वसुल करण्यासाठी मा.सर्व साधारण सभा दि.२६/०९/२०१३ मधील ठराव क्रमांक ३३० अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या ठरावात खालील प्रमाणेच्या सुधारणा प्रस्तावित करण्यात येत आहे.

**०१** निवासी वापराच्या मिळकतीच्या कोणत्याही कर योग्य मुल्यावर १० टक्के उपभोक्ता शुल्क हे कमीत कमी रू.३००/- च्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

**०२** निवासी वापरा व्यतिरिक्त सर्व मिळकतींच्या कोणत्याही कर योग्य मुल्यावर २० टक्के उपभोक्ता शुल्क हे कमीत कमी रू.५००/- च्या अधिन राहुन आकारण्यात येईल.

१०. **नामांतर शुल्क** :- खरेदी विक्री आधारे किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण केलेल्या दस्त / कागदपत्र आधारे नामांतर शुल्क कर योग्य मुल्यावर खालील प्रमाणे आकारण्यात येतील.

| **निवासी व व्यावसायीक कर योग्य मुल्य** | **नामांतर शुल्क** | |
|---|---|---|
| | **(शहर, सिडको व औद्योगिक भागातील निवासी मिळकतींसाठी)** | **(शहर, सिडको भागातील व्यावसायीक मिळकतींसाठी)** |
| रू.०१ ते १०,०००/- | रू.१५००/- | रू.३०००/- |
| रू.१०,००१/-ते ५०,०००/- | रू.४५००/- | रू.९०००/- |
| रू. ५०,००१/- ते पुढे | रू.९०००/- | रू.१८,०००/- |
| **औद्योगिक वसाहतीतील व्यावसायीक मिळकतींसाठी** | | |

| | |
|---|---|
| रू.०१ ते ५०,०००/- | रू.१८,०००/- |
| रू.५०,००१ ते १,००,०००/- | रू.३०,०००/- |
| रू.१,००,०००/- च्या पुढे | रू.७५,०००/- |

**११. विलंब शुल्क :-**

**०१.** ३१ मार्च २०१५पर्यंतच्या एकुण थकबाकीवर १० टक्के विलंब शुल्क आकारण्यात येईल.

**०२.** चालु मागणीचे बिल प्राप्त झाल्यानंतर अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रथम सहामाही देयकाची रक्कम ३० जुन पूर्वी व द्वितीय सहामाही देयकाची रक्कम ३१ डिसेंबर पूर्वी भरणे बंधनकारक आहे. जर कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर अशा अद्त रकमेबद्दल महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण-८ कराधान नियम ४१ अन्वये प्रत्येक महिन्यासाठी कराच्या २ टक्के इतकी रक्कम शास्ती म्हणून द्यावी लागेल.

**११.१** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २६७ (अ) नुसार दि.१-४-२००८ पासून अवैध बांधकाम किंवा पूनर बांधकामास तथा इमारतीवर बसविण्या योग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पट इतकी शास्ती ते बांधकाम जो पर्यंत अवैध म्हणून राहील तो पर्यंत वसूल करण्यात येईल.

**१२. विशेष सवलती :-**

**१२.१** पाच वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षीक कराच्या सामान्य करात एक वर्षाची सूट देण्यात येईल.

**१२.२** तीन वर्षाचा आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्या एक वर्षातील वार्षीक कराच्या सामान्य करात ५०% सूट देण्यात येईल.

**१२.३** जे मालमत्ताधारक चालु वर्षाचा खालील महिन्यात मालमत्ता कर भरणा करतील त्यांना सन २०१५-२०१६ करीता सामान्य करात पुढील प्रमाणे सूट देय राहील.

एप्रिल १०%

मे ८%

जुन ६%

जुलै ते मार्च पर्यंतच्या कालावधीत चालु आर्थिक वर्षातील मागणीवर तसेच थकबाकीवर सूट देय राहणार नाही.

**१२.४.** आजी / माजी सैनिकांना व स्वातंत्र्य सैनिकांना व त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या मिळकतीस मागील वर्षाप्रमाणेच सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात देखील निवासी वापर करीत असलेल्या केवळ एका मिळकतीस सामान्य करात १००% सूट दिली जाईल.

**१२.५** जे मालमत्ताधारक आपल्या मिळकतीत सोलर सिस्टीम लावतील त्यांना सामान्य करात चालु वर्षात ५% सुट दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.६ जे मालमत्ताधारक आपल्या मालमत्तेस रेन हार्वेस्टींग सिस्टीम (Rain Harvesting System) लागु करतील, अशा मालमत्ताधारकास सामान्य करात ५% सवलत दहा वर्षापर्यंत कायम ठेवण्यात येईल.

१२.७ जे मिळकतधारक नेट बॅकींग, क्रेडीट कार्ड, डेबीट कार्डव्दारे ऑन-लाईन मालमत्ता कराचा भरणा करतील त्यांना अशा मिळकतधारकांना चालु आर्थिक वर्षातील मालमत्ता कराच्या सामान्य करात १% सूट देय राहील.

**१३. कर आकारणी प्रणाली :-**

औरंगाबाद शहराचे वेगवेगळे भाग पाडुन त्याभागातील मिळकतीच्या / जागेचा मुल्यानुसार त्यांचे वाजवी भाडे आकारणी करण्यासाठी विचारात घेण्यात येते. अशा प्रकारचे भाग पाडुन मुल्यांकन हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणका मधील निवासी जागांच्या किमंती विचारात घेवुन औरंगाबाद शहराचे खालील प्रमाणे भाग करणे योग्य होईल. यामुळे औरंगाबाद शहरातील वेगवेगळया भागातील मूल्य (जागेचे) वेगवेगळे मिळवुन त्यानुसार मिळकतीचा स्तर (वर्गीकरण) होवुन त्यानुसार मालमत्ता कर आकारणीसाठी दर आकारणे योग्य राहील.

१३.१ सन २०१० चे महाराष्ट्र शासनाकडील सिध्द शिघ्र गणक (Ready Recknor) आधारे दिनांक ०१-०४-२०१० पासून औरंगाबाद महानगरपालिका हद्यीतील सर्व मिळकतीसाठी चार विभाग हे मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.९८५ दि.२०-२-२०१० नुसार पूर्वी प्रमाणेच करण्यात आलेले होते. त्यानुसार सन २०१२ मध्ये देखील चार भाग करण्यात आले होते. त्याअनुषंगाने सन २०१५ च्या सिध्द शिघ्र गणकातील दिलेल्या दरानुसार अ, ब, क, व ड असे चार भाग होतात. खालील कोणत्या भागात कोणती मिळकत येते, हे तपासता येईल. तसेच दरवर्षी दर बदलले तरी कर आकारणीसाठी हे विभाग पुढील चार वर्षासाठी असेच ठेवण्यात येतील.

| अ. क्र. | विभाग | सन २०१२ च्या विभागानुसार मिळकतीचा प्रचलीत दर /चौ.मी. | सन २०१५ च्या विभागानुसार प्रस्तावित मिळकतीचा दर /चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | अ | रू.१७,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती | रू.४५,०००/- पेक्षा जास्त असलेल्या सर्व मिळकती |
| २ | ब | रू.१३,००० ते रू.१६,९९९/- | रू.३४,९०० ते रू.४४,९९९/- |
| ३ | क | रू.११,००० ते रू.९,९९९/- | रू.३१,७९९ ते रू.३४,८९९/- |
| ४ | ड | रू.८५०० ते १०,९९९/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) | रू.२५,००० ते ३१,८००/- आणि (यापेक्षा कमी किंमतीस असलेल्या सर्व मिळकती) |

वरील प्रस्तावित दर हे महाराष्ट्र शासनाकडील औरंगाबाद शहराचे नोंदणी महानिरीक्षक, मुंद्राक शुल्क यांनी आकारणीसाठी तयार केलेले सिध्द शिघ्र गणकामधील घेण्यात आलेले आहे.

सिध्द शिघ्र गणक सन २०१५ नुसार शहरातील चार विभागांच्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार केला असता त्यामध्ये सरासरी १७४.६९ टक्के वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे सन २०१४-१५ च्या विद्यमान दरात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कर आकारणीच्या दरात सरासरी २५ टक्के वाढ प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

१४. सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षामध्ये कर योग्य मुल्य निश्चित करणेकरीता खालील प्रमाणे वर्गीकरणानुसार व सिध्द शिघ्र गणकानुसार प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर आकारण्यात येत आहे. :-

१४.१ निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर :-

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- | रू.६/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.९/- | रू.८/- | रू.७/- | रू.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.८/- | रू.३/- | रू.२/- | रू.१/- |

**१४.२ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासी वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.७.५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- | रू.६.२५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१०/- | रू.३.७५/- | रू.२.५/- | रू.१.२५/- |

**१४.३ (अ) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२२/- | रू.२०/- | रू.१८/- | रू.१७/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.७/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३/- | रू.६/- | रू.३/- | रू.२/- |

**१४.४ (अ) सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२७.५/- | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.१७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.८.७५/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६.२५/- | रू.७.५/- | रू.३.७५/- | रू.२.५/- |

**१४.५ (ब) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१३/- | रू.११/- | रू.१०/- | रू.९/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१२/- | रू.१०/- | रू.९/- | रू.८/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.११/- | रू.९/- | रू.८/- | रू.७/- |

**१४.६ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६.२५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिर्मेटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१२.५/- | रू.११.२५/- | रू.१०/- |
| ४ | सिर्मेटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१३.७५/- | रू.११.२५/- | रू.१०/- | रू.८.७५/- |

**१४.७ (क) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| **अ.क्र.** | **प्रकार** | **अ** | **ब** | **क** | **ड** |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.१७/- | रू.१५/- | रू.१४/- | रू.१३/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.१६/- | रू.१४/- | रू.१३/- | रू.१२/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१५/- | रू.१३/- | रू.१२/- | रू.११/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१४/- | रू.१२/- | रू.११/- | रू.१०/- |

**१४.८ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी कायम विना अनुदानीत शैक्षणिक संस्था वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२१.२५/- | रू.१८.७५/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.१८.७५/- | रू.१६.२५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१३.७५/- | रू.१२.५/- |

**१४.०९ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रचलीत दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.२८/- | रू.२६/- | रू.२४/- | रू.२२/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.२४/- | रू.२२/- | रू.१९/- | रू.१७/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२०/- | रू.१८/- | रू.१६/- | रू.१४/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.१६/- | रू.१४/- | रू.१२/- | रू.१०/- |

**१४.१० सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायीक वापर असलेल्या इमारतीच्या बांधकामास प्रती माह प्रती चौ.मी. साठी प्रस्तावित दर खालील प्रमाणे :-**

| अ.क्र. | प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | आर.सी.सी.छत | रू.३५/- | रू.३२.५/- | रू.३०/- | रू.२७.५/- |
| २ | गोल पटाव लाकडी छत | रू.३०/- | रू.२७.५/- | रू.२३.७५/- | रू.२१.२५/- |
| ३ | लोखंडीपत्रे (सिमेंटपत्रे) मंग्लोर टाईल्स | रू.२५/- | रू.२२.५/- | रू.२०/- | रू.१७.५/- |
| ४ | सिमेंटचे पत्रे किंवा (बांबुचे तट्टर) | रू.२०/- | रू.१७.५/- | रू.१५/- | रू.१२.५/- |

**१४.११ औद्योगिक क्षेत्रासाठी दर :-**

| अ.क्र. | बांधकामाचा वर्ग | सन २०१४-१५ साठी प्रचलीत दर | सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| | | चौ.मी. | चौ.मी. |
| १ | कारखाना कार्यालय (आर.सी.सी.) | १४.६४ | १८.३० |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | १०.३२ | १२.९ |
| | कारखाना कार्यशाळा (आर.सी.सी.) | ११.६२ | १४.५३ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी. शिटस्) | ९.०४ | ११.३० |
| २ | **कारखाना परिसरातील कॅन्टीन** | २४.०० | ३० |
| ३ | **गोदाम (आर.सी.सी.)** | ९.६८ | १२.१ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ९.६८ | १२.१ |
| | अर्ध पक्के | ५.८२ | ७.२८ |
| | कच्चे आणि विना छताचे | ३.२२ | ४.०३ |
| ४ | **शेड** | २.५८ | ३.२३ |
| ५ | सायकल स्टॅन्ड | ३.८६ | ४.८३ |
| ६ | **मशिनरी प्लॅन्ट (आर.सी.सी.)** | ११.४० | १४.२५ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | ८.८२ | ११.०३ |
| | अर्ध पक्के बांधकाम | ७.१० | ८.८८ |
| | कच्चे बांधकाम | ३.१० | ३.८८ |
| ७ | **निवासी क्षेत्र (आर.सी.सी.)** | १६.१४ | २०.१८ |
| | पक्के बांधकाम (अे.सी.सी.शिटस्) | १२.९२ | १६.५ |
| | अर्धे पक्के बांधकाम | ११.४० | १४.२५ |
| | कच्चे बांधकाम | ६.४४ | ८.०५ |
| ८ | **सहान जागा** | | |
| | कारखाना वापर | १२.०४ | १५.०५ |
| | रिकामे | ९.०३ | ११.२९ |

**१४.१२ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.००/- | रू.२.५०/- | रू.२.००/- | रू.२/- |

**१४.१३ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर रेखांकनातील मोकळया खाजगी भूखंडासाठी खुल्या जागेची कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| १ | केवळ मोकळया जागा / निवासी पार्कींग बखळ | रू.३.७५/- | रू.३.१३/- | रू.२.५/- | रू.२.५/- |

**१४.१४ सन २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रचलीत दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१२.५०/- | रू.१०.५०/- | रू.९.००/- | रू.७/- |

**१४.१५ सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी निवासेतर/व्यावसायीक इमारतीसमोरील असलेल्या मोकळ्या जागेसाठी कर आकारणीसाठी खालील प्रमाणे प्रस्तावित दर :-**

| अ.क्र. | मोकळया जागेचा प्रकार | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|---|
| २ | विकसीत केलेले व्यापारी तत्वावर वापरात असलेल्या मोकळया जमीनी बिगर निवासी प्रकार, लॉन्स, पेट्रोल पंप, गार्डन रेस्टॉरन्ट, इत्यादी | रू.१५.६३/- | रू.१३.१३/- | रू.११.२५/- | रू.८.७५/- |

**टिप** :- मोकळ्या जागेची आकारणी करतांना फक्त सामान्य कर आकारण्यात येईल.

**१५. मालमत्ता कर आकारणी करणेसाठी सन २०१४-२०१५ साठी प्रचलीत दर व सन २०१५-१६ चे प्रस्तावित दर पुढील प्रमाणे :-**

| अ.क्र. | कराचे नांव | कर योग्य मुल्य रूपये | सन २०१४-१५ साठी प्रचलीत दर | सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य कर | १. निवासी वापरासाठी | ३० % | ३० % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | ३७.५% | ३७.५% |
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | ४५% | ४५% |
| | | ४. औद्योगिक वापर | ३६% | ३६% |
| | | ५. अनुदानित शैक्षणिक संस्था | ३०% | ३०% |
| | | ६. विना अनुदानित शै.संस्था | ३७.५% | ३७.५% |
| २ | साफसफाई कर | १. निवासी वापरासाठी | ३ % | ३ % |
| | | २. निवासेत्तर वापरासाठी | १० % | १० % |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३. व्यावसायीक वापरासाठी | १० % | १० % |
| | | ४. औद्योगिक वापरासाठी | १०% | १०% |
| ३ | वृक्षकर | कोणत्याही कर योग्य मुल्यावर | १ % | १ % |
| ४ | अग्निशमन कर | | १.५ % | १.५ % |
| ५ | मनपा शिक्षण कर | | २ % | २ % |
| ६ | पथकर | | २ % | २ % |
| ७ | जललाभ कर | | १.५ % | १.५ % |
| ८ | जलनिःसारण कर | | १.५ % | १.५ % |
| ९ | सेवरेज कर | १. निवासी वापरासाठी | १० % | १० % |
| | | २. निवासेत्तर व व्यावसायीक वापरासाठी | १५ % | १५ % |
| | | ३. औद्योगिक वापरासाठी | ५ % | ५ % |
| | | ४. औद्योगिक वसाहतीतील निवासी वापर | १० % | १० % |
| १० | उपभोक्ता शुल्क | निवासी वापरासाठी | ७३० प्रती वर्ष | १० % कर योग्य मुल्यांवर कमीत कमी रू.३००/- |
| | | निवासी वापरा व्यतिरिक्त सर्व | ---- | २० % कर योग्य मुल्यांवर कमीत कमी रू.५००/- |

१६ **शासनाचे कर** :- तसेच राज्य शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे कर योग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

करिता, सन २०१५-१६ साठी मालमत्ता कर आकारणी व वसूलीचे दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री.काशिनाथ कोकाटे :स्थायी समितीकडून हा प्रस्ताव आला त्यात काही दुरूस्त्या सुचविल्या उपभोगक्ता कर ७३० आकरण्यात आला. स्लम भागातील दुर्बल घटक असलेल्या नागरीकांना हे त्रासदायक आहे. ज्यांचे १०० स्क्वे.फुट घर त्यांना व ज्यांचे ३ हजार स्क्वेअर फुट असेल त्यांनाही ७३० रू हे अन्याय कारक होईल. सरसकट १००/-रू उपभोक्ता कर आकारावे. दीड वर्षापासून हा कर आकारला जातो कमर्शिलयसाठी हा कर लावला गेला नाही. उपभोक्ता कर आकारणी करण्याचा विषय याच सभेने मंजूर केला ख-या अर्थाने कमी जास्त क्षेत्रफळ नुसार तो लागला पाहिजे सिडकोच्या घराना सर्व्हीस टॅक्स हा ७ रू स्क्वे.मीटर प्रमाणे होता परंतु

उपभोक्ता कर लावतांना ढोबळपणे ७३०रू उपभोक्ता कर लावला. यावर विचार केला नाही. जे व्यापार करत असेल दुकान असेल कमर्शीयल वापर होतो अशा इमारतीना उपभोक्ता कर का लावण्यात आला नाही. कमीत कमी १०० व जास्तीत जास्त २००-२५० हा कर आकारण्यात यावा ३६७ कोटीची भुमीगट गटार योजना राबवीत आहोत त्यात सिव्हरेज टॅक्स लावण्यात आलेला आहे. यामूळे ऑलरेडी करात वाढ आकारणी केली आहे. १.३० लक्ष मालमत्ता असल्याची नोंद आहे परंतु मनपा हद्दीत जवळपास ३ लक्ष मालमत्ता असतील. म्हणजे जे कर भरतात त्यांचेवर ही करवाढ लादणार का? दरवर्षी मालमत्ता कराचे दर निश्चित करावे लागतात हे माहित असताना घाई गरबडीने १५-२० दिवस अगोदर प्रस्ताव आणला हे बरोबर नाही. एकदोन महिने पुर्वी घेतले असते तर सांगोपाण चर्चा झाली असती. जनतेवर अन्याय होणार नाही याची दखल घ्यावी कुठल्याही प्रकारचा टॅक्स वाढविण्यात येवू नये.

श्री.समीर राजूरकर :सन १९८९ पासून कर निर्धारक व संकलन विभागाने टॅक्सचे रीव्हीजन का केले नाही? थकबाकीच्या संदर्भात ९० कोटी ते १६० कोटीपर्यंत थकबाकी असल्याच्या पेपरला सतत बातम्या असतात.या थकबाकी दारांना विश्वासात घेवून त्यांचेशी चर्चा करून त्याचा निपटारा का केला जात नाही तसेच शासनाने सांगितले म्हणून ७३० उपभोक्ता कर लावला त्यानुसार नागरीकांना सेवा दिली का ? सन २०१४-१५ या वर्षात निवासी वापरासाठी असलेल्यांना उपभोक्ता कर लावला. कमर्शिय वापरासाठीच्या नागरीकांना का लावण्यात आलेला नाही.

श्री.रेणुकादास वैद्य :घन कचरा व्यवस्थापनासाठी खर्च लागतो याचा विचार करून दिनांक २६-९-१३ ला ३३० क्रमांकाचा ठराव घेतला. त्यावेळी असे ठरले की मनपाची आर्थीक परीस्थिती बरोबर नाही महापालिकडे कर्मचारी व यंत्रणा कमी आहे खाजगी अभीकर्त्याकडून हे काम करून घ्यावे व प्रत्येक घरातून १००-५० रू घेवून या कामाचा खर्च भागवला जाईल अशी संकल्पना तत्कालीन आयुक्त यांची होती. त्यानुसार ठराव आला होता परंतु तशी कार्यवाही केली नाही त्या ठरावाचा आधार घेवून उपभोक्ता कर लावणार असेल तर चुकीचे आहे. बेसीकली तो ठराव का घेतला होता. विशेष सवलती देण्याची घोषणा करतो उदा वॉटर हार्वेस्टिंग असेल तर ५ टक्के जो ॲडव्हॉन्स टॅक्स भरेल त्यांना १० टक्के सुट दिली जाईल परंतु त्या कर भरतांना वार्ड अधिकारी त्यांचा विचार करीत नाही. यामूळे अनेकांच्या तक्रारी येतात. जर विशेष सवलती देणार असेल तर आजच्या आज तसे परीपत्रक वार्ड अधिकारी यांचेकडे पाठवावे. सुविधा देण्यासाठी कोणता स्तर उंचावला त्यामूळे कर वाढ करू शकतो कुठली वाढ करू नये.

श्री.महेश माळवतकर :मुलभूत सुविधा देत नाही त्याकडे लक्ष न देता जे नियमीत कर भरता त्यांनाच कराचा बोजा टाकण्याचे काम करू नये जे कर भरणा करीत

नाही,अधिक्रमण करतात,इमारतीच्या बाधकामात वाढ करता त्याचा शोध घ्यावा त्यातून वसुली वाढवावी.टारगेट ठरवून दिले त्यानुसार वसुली होत नाही. शहरात एकाही योजनेचे कामावर नागरीक समाधानी नाही लाईट बंद आहे गार्डनमध्ये सुविधा नाही. असे असताना टॅक्स वाढविणे योग्य नाही कोणतीही करात वाढ करू नये.

श्री.गजानन बारवाल :नागरीकांना सुविधा मिळत नाही काहींनी अर्ज करून टॅक्स आकारला जात नाही जास्त टॅक्स आकारणी केली त्यामुळे अनेक प्रकरणे न्यायालयात आहे काही प्रकरण वादग्रस्त आहे जे टॅक्स भरतात त्यांना सहकार्य दिले जात नाही. गृह निर्माण संस्था त्यांना सुविधा मिळत नाही जास्तीचा टॅक्स लावून त्रास देण्याचा प्रयत्न होतो. वसुली होत नाही अनेक सहकारी संस्था आहे. जेथे कमर्शिलय वापर होतो त्यांना त्याप्रमाणे टॅक्स असावा मोबाईल टावर्स नियमीत करून त्यांना कर लावावा उपभोक्ता कर घेतो त्या नुसार खाजगी तत्वावर घन कचरा संकलन व व्यवस्थापन ही योजना राबवावी. ज्या विशेष सवलती देणार आहे त्याची अमलबजावणी व्हावी.कोणतीही कर वाढ करू नये.

डॉ.जफर खान :या विषयास माझा विरोध आहे. आलेले विषय योग्य की अयोग्य एकूण मालमत्ता किती,महापालिकेकडे असलेल्या मालमत्तेच्या नोंदी व एमएसईबीकडे असलेल्या नोंदीमध्ये मोठा फरक आहे.रेकॉर्डनुसार किती मालमत्ताधारकाकडुन वसुली केली.किती वादग्रस्त ,कोर्टात किती प्रकरणे, किती मालमत्ता बाबत अक्षेप सर्व माहिती घ्यावी तसेच आजच्या दै.महाराष्ट्र टाईम्स मध्ये मालमत्ता कराची ३१ कोटी थकबाकी असलेल्याची यादी दिली .ही थकीत रक्कम का राहिलेली आहे जी करवाढ दिली ती स्थगित करावी.

सौ.साधना सुरडकर :जे भरतात त्यांनाच हा कर लागणार हे चुकीचे आहे.मालमत्ताच्या संख्येत मोठी तफावत आहे. सामान्य कर व विंलंब शुल्क जवळपास सारखीच रक्कम येते. एका प्रकरणात १७१४/-सामान्य कर विलंब शुल्क ११९८ दर सहा महिन्यानी तो आलेला आहे. सुट देतांना सामान्य करावर विलंब शुल्क पुर्ण रक्कमेवर आकारतो. विलंब शुल्क सुध्दा सामान्य करावर आकारला जावा. नसता जी सुट दयायची ती पुर्ण रक्कमेवर दयावी. यात कोणतीही करवाढ होवू नये.

श्री.सुरेंद्र कुलकर्णी :सर्वांचा या करवाढीला विरोध आहे. अनेक प्रॉपर्टीना टॅक्स लागलेले नाही ज्यांना टॅक्स लावला त्यांचेवर बोजा टाकतो. ज्यांचेकडे सोलार सिस्टम आहे, वाटर हार्वेस्टिंग केले त्यावर सुट देण्याची घोषणा होते त्यासाठी नागरीकांना अनेक चकरा माराव्या लागतात. आपले कर्मचारी अनेक कारणे नागरीकांना सांगतात. करदाता जातो तेंवढीच रक्कम तो भरणा करतो वार्डात आवश्यक सोयी सुविधा मिळत नाही रस्त्याची कामे होत नाही. अनेक ठिकाणी खड्डे पडले लोकांना पाठीचे आजार होत आहे. कोणतीही दरवाढ करू नये.

श्री.गिरजाराम हाळनोर :कचरा संकलण खाजगीकरणातून होणार होते. जो कुणी ठेकेदार नेमणार ते डीपीआर तयार करून आधुनीक तंत्रज्ञानाचा वापर करून घरोघरी जाऊन ओला-सुका कचरा संकलन करून एका ठराविक पॉईन्टवर तो जमा करेल ओला कचरा-याचे खत तयार करून व सुका कचरा-याचा योग्य वापर होईल असे तत्रज्ञान वापरून कार्यावाही करणार. त्यासाठी हा उपभोक्ता कर घेणार होतो असे त्यावेळी ठराव मंजूर करतांना म्हटले होते नागरीकाच्या घरातून कचरा जमा होत नाही. परंतु अशी कार्यवाही झाली नाही. हा कर लावायचा की नाही याचा विचार व्हावा. नियमीत व वेळेवर टॅक्स भरणारे नागरीक आहे.पाच वर्षाचा टॅक्स भरेल त्यांना एक वर्षाच्या सामान्य करात सुट आणी दरवर्षी एप्रिल मध्ये कुणी टॅक्स भरला तर त्यास सामान्य करात १० टक्के सुट म्हणजे पाच वर्ष भरणाराला ५० टक्के सुट व एकदम भरणाराला ३० टक्के सुट हे योग्य नाही.जो कुणी ५ वर्षाचा टॅक्स भरेल त्यास दोन वर्षाची सुट दयावी.

श्री.मीर हिदायत अली :कर वाढ करू नये. मनपा हद्दीत ३ ते ४ लाख मालमत्ता असतील. नवीन मालमत्तेचा शोध घ्यावा त्यांना टॅक्स लावून वसुली वाढवावी. जे टॅक्स भरतात त्यांचेवर हा बोजा टाकणे योग्य नाही. १०-१० वर्षापासूनची थकबाकी असणारे मालमत्ता धारक आहे त्यांचेकडून वसुली करावी. डेंग्यूची साथ चालू होती त्यावेळी आरोग्य विभागाने स्थायी समितीमध्ये खुलासा केला शहरातील २.७२ लक्ष प्रॉपर्टीचा सर्वे केला तो फक्त ७० टक्केच होता. याचा अर्थ ३.५० लक्ष ते ४ लक्ष मालमत्ता शहरात आहे. दीड ते दोन लक्ष प्रॉपर्टीची नोंदच नाही. नवीन प्रॉपर्टीचा सर्वे करण्यासाठी पथक तयार करण्याचे आदेशीत करावे नवीन मालमत्ता शोधून त्यांना टॅक्स लावावा. वसुली वाढेल. या करात वाढ करू नये.

श्री.किशोर नागरे :कर आकारणी बाबत न्यायप्रविष्ठ प्रकरणे आहे. वाद चालू आहे अशांना प्रत्यक्ष बोलवून तडजोड करून प्रकरणे निकाली काढावी उपआयुक्तावर ही जाबाबदारी सोपवावी यामूळे वसुलीत वाढ होईल.

श्री.रेणुकादास वैद्य : करदाता जेवढी रक्कम भरण्यास तयार आहे ती भरणा करून घ्यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :रस्त्यासाठी काही लोकांची घरे पाडली गेली. उर्वरीत भागाची दुरूस्ती त्यांनी केली वापर बदलेला नाही त्यामूळे त्यांना नवीन एनआरव्ही नुसार टॅक्स लावू नये.

कर निर्धारक व संकलक: मालमत्ताचे कराचे सन १९८९ ला रिव्हीजन झाले होते त्यानंतर झाले नाही. जेथे धार्मीक स्थळ आहे तेथील कमर्शियल दुकानांना कर लावलेला आहे धार्मीक स्थळास कर लावलेला नाही. ३८४ मोबाईल टावर्सला कर लावलेला आहे.

श्री.समीर राजूरकर :२५० कोटीची थकबाकी वसुलीसाठी काय प्रयत्न केले. सतत चार वर्षापासून ही थकबाकी रक्कम दिसते. या मिळकतीच्या कराबाबत

निवाडा करण्यासाठी स्थायी समितीच्या हॉल मध्ये सुनावणी घेतली होती त्यासाठी काय प्रयत्न केले.

कर निर्धारक व सकंलक:२५० कोटीच्या थकबाकीमध्ये रहिवासी वापरातील सुध्दा मालमत्ता धारक आहे तेथे सक्तीने वसुली करीत नाही.

श्री.समीर राजूरकर :आजच्या वृत्तपत्रात थकबाकी दारांची नावे आली त्यात ७० टक्के कमर्शिलय लोक आहे. रहिवासी मालमत्ताच्या नावाखाली ही वसुली होत नसेल तर योग्य नाही. कमर्शियल करदात्यांना पाठीशी घालू नये.वसुली करावी.

श्री.रेणुकादास वैद्य :५-६ कर्मचारी कायमचेच या विभागात आहे. काम करण्याची दखल घेत नाही. माझ्या वार्डात मंगल कार्यालयाशेजारी तीन शटर्स त्यास टॅक्स लावला त्या व्यक्तीला नोटीस दिली नाही त्यांना माहित नाही. अशा प्रकारचे काम होत असेल तर बरोबर नाही. तसेच एका ठिकाणी बिल्डरने इमारत बांधली तेथे दोन शटर्स खाली होते कागदपत्र न घेता वॉचमनच्या नावाने टॅक्स लावण्यात आला याचा अर्थ काम करतांना आपल्या अधिका-यामध्ये सुसूत्रता नाही.असा प्रकार होत असेल तर वसुली वाढणार नाही.

श्री.किशोर नागरे :ज्यांना नोटीस देणार त्यांना अगोदर विचारणा करावी, किती रक्कम भरण्यास तयार आहे २५० कोटी थकबाकी किमान २०० कोटी वसुल होतील.

कर निर्धारक व संकलक:जी यादी प्रसिध्द झाली त्यात रहिवासी मालमत्ता पण आहे कार्यवाही प्रस्तावित केली जे व्यावसायिक मिळकती त्यात असेल तेथे १०० टक्के वसुली होणार आहे. ३८४ मोबाईल टावर्स आहे. त्यांना साधारण कर लावत होतो. गेल्या वर्षी त्यास दुप्पट कर लावला त्यातून ६.५० कोटी वसुली झाली. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामूळे पुढील वसुली थांबलेली आहे.

श्री.गजानन बारवाल :अनाधिकृत टावर्स किती आहे.

कर निर्धारक व संकलक:४६ टावर्स आहेत.

श्री.गजानन बारवाल :इलिगल आहे त्याचेवर कार्यवाही होत नाही. जनरेटर मशीन खाली असते ४-५ स्क्वे मीटर जागेला कमर्शियल टॅक्स लावावा. त्यास टॅक्स लागला जात नाही. त्या इमारतीला टॅक्स नाही.

कर निर्धा. व संकलक : ज्या इमारतीवर टावर्स आहे त्या इमारतीला कमर्शियल टॅक्स लावला जात आहे.एकूण मालमत्ता १,९२,९१२,कमर्शियल १९४४३ त्यापैकी ८५७८ मालमत्ताचे कर वसुल केले उर्वरीत १०८६५ मालमत्ताची वसुली येणे बाकी आहे. निवासी मालमत्ता १,७३५७० त्यापैकी ३८२०० ची वसुली झाली २२ टक्के वसुली केली १,३५,३४६ मालमत्ताची वसुली झाली नाही.

श्री.गजानन बारवाल :वसुली होत नाही खाजगीकरणाचा प्रस्ताव तयार केला काय ?

कर निर्धा. व संकलक :प्रस्ताव तयार करून शासनाकडे पाठविला होता शासनाने ती रद्द ठरवला. निवासी मालमत्ता कराची थकबाकी १९३ कोटी व कमर्शियल कराची थकबाकी ७७.७५ कोटी आहे.

श्री.समीर राजूरकर :७७ कोटीची थकबाकी किती वर्षापासून बाकी आहे. ही वसुली करण्यासाठी दोन वर्षात काय प्रयत्न केले. व वसुली का झाली नाही.

कर निर्धा.व संकलक :सन २०१२-१३ च्या अगोदर ५६ कोटी होते सन २०१२-१३ मध्ये मध्ये ७४ कोटीवर गेली व २०१३-१४ मध्ये तीच वसुली ९० कोटीवर गेली.

श्री.समीर राजूरकर :ज्यांचेकडे कमर्शिलय मालमत्ता कराची थकबाकी आहे त्याकडे हा विभाग लक्ष देत नाही. जे भरतात त्यांना ३१ डिसेंबरच्या अगोदर नोटीस दिली जाते.१९८९ पासून टॅक्स रिव्हीजन केले नाही दोन वर्षापासून हा विषय चर्चेला आणतो तरी रिव्हीजन होत नाही एक मजली इमारती ५ मजली झाली आहे. तरी रिव्हीजन होत नाही.दिलेल्या नोटीसमध्ये १०-१० हजार वाढीव टॅक्स येतो. मागिल वर्षी कमर्शिलय जे असतील त्यांना उपभोक्ता कर आकारण्यात आला नाही यास कोण जबाबदार आहे. लॅण्डसाठी ८० लक्ष ते १ कोटी खर्च केले त्याचे आऊटपूट काहीच नाही. असे प्रस्ताव येतांना अगोदर प्रशासनाने त्याचे कामाची सिस्टम सुधारावी. रिव्हीजन करावे, मालमत्तेचा ब्लॉक सर्वे करावा. त्यानंतर वार्ड वाईज करावे. हे केले तर वसुलीत वाढ होईल. महापालिकेच्या कर्मचा-यांना निकवडणुकीच्या कामासाठी प्रगणक म्हणून काम दिले जाते ब्लॉक सर्वे आपले कर्मचारी करू शकतात.

कर निर्धा.व संकलक :सिस्टम सुधारण्यासाठीच हा प्रस्ताव आहे.

श्री.समीर राजूरकर :मुळीच नाही मागिल वर्षी कमर्शियल मालमत्तेला उपभोक्ता कर का आकारला नाही.

सौ.अनिता घोडेले :मालमत्ता कर वसुली मालकाकडून की भाडेकरून वसुल करतात.

कर निर्धा.व संकलक :घर मालकाकडुन वसुली केली जाते.

सौ.अनिता घोडेले :एक भाडेकरू आहे त्यांचेकडून वसुली केली. मुलाकडून ४० हजार वसुल केले. एकुण घेत नाही ही पध्दत बरोबर नाही.

श्री.समीर राजूरकर :मालमत्ताचे रिव्हीजन केल्यास हया अडचणी येणार नाही शासनाने म्हटले म्हणून हा कर आकारला गेला परंतु नागरीकांना त्या प्रमाणात सुविधा देत नाही.

कर निर्धारक व संकलक:भाडेकरूचा काहीही संबध येत नाही.मूळ मालक जे असतात त्यांनी टॅक्स भरला नाही तर प्रॉपर्टी जप्त करता येते.

सौ.अनिता घोडेले :याचा अर्थ प्रशासनाची चुक झाली भाडेकरू कडून टॅक्स वसुल केला संबंधीतावर काय कार्यवाही करणार आहे.

श्री.गजानन बारवाल :अशा प्रकारच्या किती तक्रारी आलेल्या आहे.

श्री.समीर राजूरकर :उपभोक्ता कर लावला मागिल वर्षी घरोघरी जाऊन कचरा उचलला का?

कर निर्धा.व संकलक :मागिल वर्षी व्यावसायीक मालमत्तांना उपभोक्ता कर लागलेला नाही कारण प्रस्ताव ऑलरेडी झालेला होता.

श्री.समीर राजूरकर :प्रस्ताव प्रशासनाने ठेवलेला होता. मालमत्ताचे रिव्हीजन होत नाही.ज्या कमर्शियल कराची थकबाकी आहे त्यांना प्रत्यक्ष बोलवून सुनावणी घ्यावी विधी सल्लागार यांना बोलवून न्याय निवाडा करावा वसुली वाढवावी. मागच्या वर्षी व्यावसायिक मालमत्ता धारक यांना हेतुपुरस्सर उपभोक्ता कर लावला नाही यास कोण जबाबदार आहे जे दोषी असेल कार्यवाही करावी.

कर निर्धा.व संकलक :घनकचरा विभाग या बाबत खुलासा करेल.

श्री.समीर राजूरकर :प्रस्ताव कुणी ठेवला होता.

श्री.काशिनाथ कोकाटे :दुरूस्ती सह मंजूर करावे.

श्री.समीर राजूरकर :७३०रू प्रमाणे उपभोक्ता कर आकारणी केली किती वसुली झाली. कमर्शिलय मालमत्ता धारक याचेकडून किती वसुली येणे आहे व किती वसुल केले उपभोक्ता कर लावता परंतु सेवा देत नाही ही करवाढ मान्य नाही.

श्री.किशोर नागरे :सन २०१४-१५ साठी जी कर आहे तोच सन २०१५-१६ साठी असावे. तसेच उपभोक्ता कर कमीत कमी असावा. सहा महिण्यापर्यंत थकबाकीवर २ टक्के दंड दिला तो रद्य करावे. विलंब शुल्क रद्य करावे.

श्री.गजानन बारवाल :विलंब शुल्क चालू मागणीमध्ये समाविष्ट होऊ नये तशी दुरूस्ती कॉम्प्युटर सॉप्टवेअर मध्ये व्हावी.जे मालमत्ता धारक सन २०१५ पर्यंत पुर्ण थकबाकी रक्कम भरतील त्यांना दंड/व्याज (विलंब शुल्क) माफ करावे.तसेच रस्ता रूंदीकरणामध्ये ज्यांच्या मिळकती बाधीत झाल्या त्यांना जुन्या एनआरव्ही प्रमाणे कर आकारणी करावी.पाच वर्षाचा मालमत्ता कर ॲडव्हान्स मध्ये भरणा-यांना वार्षीक कराच्या सामान्य करात एक वर्षा ऐवजी दोन वर्षाची सूट द्यावी.रेन वॉटर हार्वेस्टींग करणा-यांना सामान्य करात २५ टक्के सुट देण्यात यावी.

मा.उपमहापौर :ठराव मंजूर झाल्यानंतर वार्ड अधिकारी यांचेकडे ठरावाची प्रत उशीरा जाते तसे न होता हा ठराव मंजूर केल्यानंतर तात्काळ वार्ड अधिकारी यांचेकडे प्रत दोन दिवसात अंमलबजावणीसाठी देण्यात यावी.

डॉ.जफर खान :कर दाता थकीत रक्कम ३० टक्के भरणा करीत असेल तर ती भरून घेण्यात यावी.

मा.महापौर :या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. या विषयाच्या संदर्भात पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येतो.१) २०१४-१५ प्रमाणेच २०१५-१६ ची मालमत्ताची कर आकारणी करण्यात यावी. २) उपभोक्ता करामध्ये निवासी वापरासाठी रु.७५०/- आणि निवासेत्तर व इतर वापरासाठी रु.१०००/- आकारण्यात यावे. ३) सहा महिन्याच्या थकबाकीसाठी प्रत्येक महिन्यासाठी २% दंड प्रस्तावित केलेला आहे, तो रद्द करावा. ४) विलंब शुल्कावर देखील व्याज आकारण्यात येते ते बंद करण्यात यावे. ५) विलंब शुल्क चालू मागणीत बिलामध्ये समाविष्ट असते. यात दुरूस्ती करावी. ६) धार्मिक स्थळांच्या कर आकारणी संदर्भात नियमानुसार

कार्यवाही व्हावी. ७) जे मालमत्ता कर सन २०१५ पर्यंत पुर्ण थकबाकीसह भरतील त्यांना दंड/व्याज पुर्णपणे माफ करण्यात येतो. ८) रुंदीकरणामध्ये गेलेली आहेत त्यांनी जुनीच एन.आर.व्ही. लावण्यात येते. ९) पाच वर्षे आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरणाऱ्यास वार्षिक कराच्या सामान्य करात दोन वर्षाची सुट देण्यात येते. १०) रेन वॉटर हार्वेस्टींग करणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात २५% सुट देण्यात येते.

श्री.काशिनाथ कोकाटे :उपभोक्ता कर ७५० रू जास्त होतो तो कमी करावा सिडकोतील नागरीकांवर अन्याय होणार आहे.त्यांची घरे लहान आहे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

मा.उपमहापौर :मा.महापौर कुठल्याही करात वाढ करीत नाही.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-१५ प्रमाणेच २०१५-१६ ची मालमत्ताची कर आकारणी करण्यास व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे उपभोक्ता करामध्ये निवासी वापरासाठी रु.७५०/- आणि निवासेत्तर व इतर वापरासाठी रु.१०००/- आकारण्यास, तसेच सहा महिन्याच्या थकबाकीसाठी प्रत्येक महिन्यासाठी २% प्रस्तावित केलेला दंड तो रद्द करणे, विलंब शुल्कावर व्याज आकारणी बंद करणे. विलंब शुल्क चालू मागणीत बिलामध्ये समाविष्ट असते.कॉम्प्युटरच्या सॉपटवेअरमध्ये त्यात दुरूस्ती करणे. धार्मिक स्थळांच्या मिळकतींना मालमत्ता कर आकारणी संदर्भात नियमानुसार कार्यवाही करणे तसेच जे मालमत्ता कर सन २०१५ पर्यंत पुर्ण थकबाकीसह भरतील त्यांना दंड/व्याज पुर्णपणे माफ करण्यास आणि रुंदीकरणामध्ये भुसंपादीत झालेल्या जागा वगळून शिल्लक राहिलेल्या जागेला जुनीच एन.आर.व्ही. लावणे व जे मालमत्ता धारक पाच वर्षे आगाऊ (ॲडव्हान्स) मालमत्ता कर भरतील त्यांना दोन वर्षाचे सामान्य करा एवढी रक्कमेत सुट देणे तसचे रेन वॉटर हार्वेस्टींग करणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करात २५% सुट देण्याच्या दुरूस्तीसह मालमत्ता कर आकारणीच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७४७:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी मा. सर्वसाधारण सभा दि. ११.०१.२००७ विषय क्र. ६५५/४ नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम २००७ ते २०१२ या कालावधीकरिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा आर्थिक भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. मा. अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा पुणे यांचे पत्र जा.क्र. राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-१७/२०१७२-४४/०७ दिनांक २६.०३.२००७ प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यु व बालमृत्यु एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात.

वरील उद्दीष्टांच्या अनुषंगाने मनपा हद्दीत ५०००० लोकसंख्येमागे १ हेल्थ पोस्ट याप्रमाणे आर सी एच प्रकल्पा अंतर्गत ९ आरोग्य केंद्रांची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये मनपाच्या ५ आरोग्य केंद्रांची श्रेणीवर्धन करण्यात आले असून नवीन ४ आरोग्य केंद्रे सुरु करण्यात आली आहे.

साधारणत: ४.५० लक्ष पेक्षा जास्त जनतेस या ९ नागरी आरोग्य केंद्रामार्फत सेवा दिली जाते. यामध्ये गर्भवती मातांना प्रसुती पुर्व व प्रसूती पश्चात सेवा दिल्या जातात. तसेच मातांचे लसीकरण, बालकांचे लसीकरण, अतिजोखमीच्या माता व बालकांकरिता खाजगी वैद्यकीय व्यावसायिक यांच्यामार्फत विशेष आरोग्य सेवा सत्रांचे आयोजन करण्यात येते. तसेच सर्व राष्ट्रीय कार्यक्रम अंमलबजावणी किशोरवयीन मुले व मुलीकरिता आरोग्य सेवा सत्र, ४० वर्षावरील लाभार्थीसाठी आरोग्य सेवा सुरु करणे,वै्द्यकीय अधिकारी व कर्मचा-याचे प्रशिक्षण, आरोग्य विषयक जनजागृती करण्याचे कार्य करण्यात येते.

दिनांक ११/०७/२००७ च्या मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनुसार वरील सर्व सेवा सुविधा देण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ शासनाच्या कृती आराखडयास आधिन राहून आर सी एच-२ अंतर्गत करारपद्धतीने व ठराविक वेतनावर १ कार्यक्रम व्यवस्थापक, ५ महिला वैद्यकीय अधिकारी, ५ स्टाफ नर्स, २२ एएनएम असे एकूण ३३ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने करण्यात आलेली आहे. वरील प्रमाणे नमूद केल्यानुसार शहरातील जनतेला नियमित स्वरुपात आरोग्य सेवा देण्याकरिता सदरील पदांची आवश्यकता आहे. तसेच पीएमयू युनिट अंतर्गत पदाची शासन स्तरावर वेळोवेळी आरोग्य विषयक अहवाल सादरीकरण, कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणीसाठी व समन्वय साधण्यासाठी पीएमयू युनिटची आवश्यकता आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे यासर्व पदाची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत ३३ अधिकारी व कर्मचारी आहेत त्यांना देण्यात येणा-या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नांव | पदनाम | ठराविक वेतन प्रतिमाह |
|---|---|---|---|
| १ | डॉ.गणेश शिंदे | कार्यक्रम व्यवस्थापक | रु. १८०००/- |
| २ | डॉ.वैशाली मुदगडकर | एलएमओ | रु.१५०००/- |
| ३ | डॉ.ऋता आनंदगांवकर | एलएमओ | रु.१५०००/- |
| ४ | डॉ.श्रध्दा नाईक | एलएमओ | रु.१५०००/- |
| ५ | डॉ.आयेशा कादरी | एलएमओ | रु.१५०००/- |
| ६ | डॉ.खान आलिया | एलएमओ | रु.१५०००/- |
| ७ | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.८०००/- |
| ८ | श्रीमती सुनिता नरवडे | स्टाफ नर्स | रु.८०००/- |
| ९ | श्रीमती विद्या शर्मा | स्टाफ नर्स | रु.८०००/- |
| १० | श्रीमती ज्योती बनकर | स्टाफ नर्स | रु.८०००/- |
| ११ | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.८०००/- |
| १२ | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.६०००/- |
| १३ | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.६०००/- |
| १४ | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.६०००/- |
| १५ | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.६०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| १६ | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.६०००/- |
| १७ | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.६०००/- |
| १८ | श्रीमती सोनाली भिसे | एएनएम | रु.६०००/- |
| १९ | श्रीमती सुनिता जाधव | एएनएम | रु.६०००/- |
| २० | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.६०००/- |
| २१ | श्रीमती वर्षा सोनवणे | एएनएम | रु.६०००/- |
| २२ | श्रीमती सुनंदा चव्हाण | एएनएम | रु.६०००/- |
| २३ | श्रीमती सारिका इंगळे | एएनएम | रु.६०००/- |
| २४ | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.६०००/- |
| २५ | श्रीमती वैशाली बि-हारे | एएनएम | रु.६०००/- |
| २६ | श्रीमती स्वाती भागवत जिरीमाळी | एएनएम | रु.६०००/- |
| २७ | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.६०००/- |
| २८ | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.६०००/- |
| २९ | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.६०००/- |
| ३० | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.६०००/- |
| ३१ | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.६०००/- |
| ३२ | श्रीमती प्रियंका मगरे | एएनएम | रु.६०००/- |
| ३३ | श्रीमती ए.जे. मकासरे | एएनएम | रु.६०००/- |

सध्या कार्यरत ३३ अधिकारी व कर्मचारी यांना वेतनाकरिता प्रतिमाह रु.२,६५,०००/- व वार्षिक रु.३१,८०,०००/- खर्च अपेक्षित आहे.सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प **सन २०१४-१५ अनुक्रमांक १३ मधील लेखाशिर्ष माता व बाल संगोपन (आरसीएच)** रू.९६.२५ लक्ष अनुदानातून करण्यात येत आहे. आरसीएच-२ अंतर्गत अधिकारी व कर्मचा-यांच्या दिनांक १३.०८.२०१४ ते १२.०१.२०१५ पर्यंतच्या कालावधीतील मुदतवाढीचा प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव सादर. तसेच प्रस्तावित केलेल्या आरोग्य सेवा नियमित स्वरुपात देण्याकरिता उपरोक्त अधिकारी व कर्मचा-यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजेच दिनांक १५/१/२०१५ ते दिनांक १४/०७/२०१५ या ६ महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :विषय मंजूर
श्री.मीर हिदायत अली :खुलासा करण्यात यावा.
श्रीमती सत्यभामा शिंदे :आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा खुलासा घ्यावा.

श्री.प्रिती तोतला :विषय मंजूर केला परंतु त्या कर्मचा-याचे पाच महिण्यापासून पगार का थांबविण्यात आलेला आहे. तुटपुंज्या पगारामध्ये ते कर्मचारी दिवसभर मेहनत करतात. नागरीकांचे आरोग्यासाठी काम करतात.

श्री.समीर राजूरकर :आरसीएच प्रकल्प चालू आहे का?

मा.महापौर :विषय मंजूर केलेला आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन बाल आरोग्य सेवा टप्पा-२ राबविण्यासाठी प्रस्तावात नमुद ३३ अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने करण्यात आलेली असून शहरातील जनतेला नियमित स्वरुपात आरोग्य सेवा देण्याकरिता सदरील पदांची आवश्यकता असल्याने आरसीएच-२ अंतर्गत प्रस्तावित केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १३.०८.२०१४ ते १२.०१.२०१५ पर्यंतच्या कालावधीतील मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देण्यात येते. तसेच प्रस्तावित केल्याप्रमाणे आरोग्य सेवा नियमित स्वरुपात देण्याकरिता उपरोक्त अधिकारी व कर्मचा-यांना दोन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दिनांक १५/१/२०१५ ते दिनांक १४/०७/२०१५ या ६ महिन्याच्या कालावधी करीता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगर भूमापन क्रमांक ११३९१/पैकी मोहल्ला फाजलपुरा येथे खाजगी मालमत्तेवर सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेले आहे. पी.आर.कार्डवर श्री.संजय टोणपे यांचे नांव असून, सार्वजनिक वापरासाठी व आजुबाजुच्या नागरीकांच्या सुविधा होईल या हेतुने साधारण: २० ते २२ वर्षापासुन सार्वजनिक शौचालय आहे. यापोटी महानगरपालिकेने संबंधीतास मोबदला दिल्याचे दिसून येत नाही. जागेचे भुसंपादन करण्या संबंधीची कार्यवाही अदयापपर्यंत झालेली नाही.

मोहल्ला फाजलपुरा येथे संबंधीत खाजगी व्यक्तीच्या जागेवर भूसंपादन न करता सार्वजनिक शौचालयाची उभारणी २० ते २५ वर्षापासून केलेली असल्या बाबत मालमत्ता अधिकारी यांनी दिनांक १७.०२.२०१४ रोजीच्या मा.स्थायी समिती सभेमध्ये उल्लेख केलेला आहे.

संबंधीत व्यक्ती सन १९९१ पासून सतत महानगरपालिकेकडे पाठपुरावा करत आहे. सार्वजनिक वापरासाठी आवश्यक असलेली मिळकतीसाठी, पी.आर.कार्डनुसार जागेच्या भुसंपादनाची कार्यवाही करावी लागणार आहे. व संबंधीत मिळकत मालकास मोबदला अदा करावा लागणार आहे.

आजुबाजुच्या नागरीकांना सुविधा होईल या हेतुने शौचालयाची आवश्यकता असल्याने भुसंपादन करणे आवश्यक आहे. व सन २०१५ च्या शिध्द सिघ्र गणक दरानुसार संबंधीतास मोबदला अदा करावा लागणार आहे.

करीता फाजलपुरा येथील नगर भुमापन क्रमांक ११३९१/पैकी या मिळकतीवर बांधलेल्या सार्वजनिक शौचालयाची खाजगी जागा भूसंपादन करणेसाठी व भूसंपादनासाठी लागणाऱ्या मोबदला व इतर खर्चासह मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.महापौर :विषय मंजूर

श्री.प्रमोद राठोड :खुलासा घ्यावा.

| | |
|---|---|
| श्री.अफसर खान | : २०-२५ वर्ष झाले. किती पैसे देणार आहे खुलासा झाला पाहिजे. |
| श्री.काशिनाथ कोकाटे | :हे भ्रष्टाचार करण्यासाठी आणलेले ठराव आहेत. |
| श्री.अफसर खान | :कोणाची जागा आहे कशाची जागा होती किती पैसे दयावे लागणार आहे. |
| मा.महापौर | :खाजगी जागेवर महानगरपालिकेने सुलभ शौचालय बांधलेले आहे. १९९१ पासून त्या जागेवर महापालिकेचे सुलभ शौचालय आहे. नियमाप्रमाणे जे बसेल त्याप्रमाणे मोबदला दयावा. |

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

| | |
|---|---|
| मा.महापौर | :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा. |
| श्री.अफसर खान | :खुलासा घेण्यात यावा. |
| सहा.संचालक(न.र) | :औरंगाबाद महानगरपालिकेने सार्वजनिक वापरासाठी या जागेवर शौचालय १०.५X३.२५ मी म्हणजेच ३४ स्क्वे.मी. म्हणजे सुमारे ४०० स्क्वे. फुटाचे सुलभ शौचालयाचे बांधकाम केलेले आहे.४०० स्क्वे. फुटाच्या जागेची खाजगी मालकी श्री.संजय टोणपे या खाजगी व्यक्तीची आहे. हा प्रस्ताव भुसंपादनासाठी भुसंपादन अधिका-याकडे पाठवायचा आहे |
| श्री.समीर राजूरकर | :किती दिवसापासून तो व्यक्ती भुसंपादनाची कार्यवाही करण्याची मागणी करीत आहे व किती रक्कम मोबदला दयावा लागणार आहे. |
| सहा.संचालक(न.र) | :संबधीत व्यक्ती २० वर्षापासून मागणी करीत आहे. |
| श्री.समीर राजूरकर | :२० वर्षापासुन त्या व्यक्तीने जागा दिली भुसंपादन विभाग व नगररचना विभाग २० वर्षापासून त्या व्यक्तीचा छळ करीत आहे. तो व्यक्ती १०० स्क्वे. फुटामध्ये २० वर्षापासून राहतो. जागा दिल्यानंतर लगेच भुसंपादनाची कार्यवाही का केली नाही.२० वर्ष का उशीर झाला. |
| मा.महापौर | :२० वर्षापासून त्या व्यक्तीची जागा घेतली त्यास काहीही मोबदला दिला नाही तेंव्हापासून तो महापालिकेकडे मोबदला देण्याची मागणी करीत आहे. |
| डॉ.जफर खान | :२० वर्षापासून तो व्यक्ती चकरा मारतो यास कोण जबाबदार आहे या प्रोसेसला उशीर का झाला. |
| श्री.अफसर खान | :ते व्यक्ती २० वर्ष गप्प का राहिले आतापर्यंत कार्यवाही केली नाही. किती जागा आहे किती रक्कम दयावी लागणार आहे. आखीव पत्रिका कुठे आहे डाक्युमेंट कुठे आहे मंजूरीला विरोध नाही पण माहीती कळायला पाहिजे. |
| मा.महापौर | :नियमाप्रमाणे जो मोबदला होईल त्या प्रमाणे कार्यवाही करावी. |
| सहा.संचालक (न.र) | :४०० स्क्वे.फुट जागा आहे.हा प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर भुसंपादन अधिकारी यांचेकडे पाठवून ते किंमत काढून कळवतील त्याप्रमाणे कार्यवाही होईल. |
| श्री.कृष्णा बनकर | :अधिका-यांना संबधीत व्यक्ती भेटले नाही म्हणून उशीर झालेला आहे का? |

मा.महापौर :नियमाप्रमाणे त्याची जेवढी जागा घेतली त्या हिशोबाने त्यास मोबदला देण्यात यावा. विषय मंजूर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भूमापन क्रमांक ११३९१/पैकी मोहल्ला फाजलपुरा येथील खाजगी मालमत्तेवर सार्वजनिक शौचालय बांधलेले असून प्रस्तावात नमुद पी.आर.कार्ड वरील नोंदीनुसार श्री.संजय टोणपे यांचे नाव आहे. या खाजगी जागेचे रितसर भूसंपादन करणेसाठी व भूसंपादनासाठी लागणाऱ्या मोबदला व इतर खर्चास मान्यता देण्यात येवून नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कायर्वाही व्हावी.

**विषय क्रमांक ७४९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२५ अंतर्गत असलेल्या एफ सेक्टर मध्ये महनगरपालिकेचे उद्यान आहे. या भागातील नागरीकांनी या उद्यानास संत ज्ञानेश्वर उद्यान असे नाव देण्याची मागणी केली आहे. करीता वरीलप्रमाणे भागातील उद्यानास संत ज्ञानेश्वर उद्यान असे नाव देण्याबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक :-** श्री. काशीनाथ हरिभाऊ कोकाटे

**अनुमोदक :-** श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली, श्री.संजय सांडू चौधरी.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२५ अंतर्गत असलेल्या एफ सेक्टर येथील महापालिकेच्या उद्यानास संत ज्ञानेश्वर उद्यान असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५० :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.२४ या वॉर्डासाठी अर्थसंकल्प सन २०१४-१५ मध्ये असलेल्या खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यात यावे.

| पान क्रमांक व अ.क्र. | कामाचे नाव (जुने लेखाशिर्ष) | सुधारित लेखाशिर्ष |
|---|---|---|
| एससीआर-बी-६<br>अ.क्र.१२ | २०१४-१५ स्थायी समितीने शिफारस केलेली कामे.<br>वॉर्ड क्र.२४ अंतर्गत जलनिस्सा:रण देखभाल दुरूस्ती र.रु.१०.०० लक्ष | वॉर्ड क्र.२४ अंतर्गत नारेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या आर.सी.सी.छताचे सुशोभिकरण व इतर कामे करणे.र.रु.६.०० लक्ष वळती करणे. |

**सुचक :-** श्री.राजु रामराव शिंदे **अनुमोदक :-** श्री.समीर सुभाष राजूरकर

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२४ या वॉर्डासाठी खालील कामांचे लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| पान क्रमांक व अ.क्र. | कामाचे नाव (जुने लेखाशिर्ष) | सुधारित लेखाशिर्ष |
|---|---|---|
| एससीआर-बी-६<br>अ.क्र.१२ | २०१४-१५ स्थायी समितीने शिफारस केलेली कामे. | वॉर्ड क्र.२४ अंतर्गत नारेगाव येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर |

| | | |
|---|---|---|
| | वॉर्ड क्र.२४ अंतर्गत जलनिस्सा:रण देखभाल दुरूस्ती र.रु.१०.०० लक्ष | पुतळ्याच्या आर.सी.सी.छताचे सुशोभिकरण व इतर कामे करणे.र.रु.६.०० लक्ष वळती करणे. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५१ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, एन-११-अे सेक्टर सुदर्शननगर बाळासाहेब उद्यान येथे वाचनालय सुरु करावयाचे आहे खर्च रक्कम रु.१००० प्रतिमाह तसेच मनपा एन-११ शाळा येथे देखील वाचनालय सुरु करावयाचे आहे. करीता पाच टेबल १५ खुर्च्या व वृत्तपत्रे आणि मासिके यासाठी खर्च रक्कम रु.१०००/- तरतुद करण्यात यावी. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**सुचकः-** श्री.किशोर बाबुराव नागरे,श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर.

**अनुमोदकः-** श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये.

मा.महापौर :विषय मंजूर

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-११-अे सेक्टर सुदर्शननगर बाळासाहेब उद्यान येथे तसेच मनपा एन-११ शाळा येथे वाचनालय सुरु करण्यास व त्यासाठी येणारा खर्च रक्कम रु.१०००/- प्रतिमाह व पाच टेबल १५ खुर्च्या व वृत्तपत्रे आणि मासिके यासाठी खर्च रक्कम रु.१०००/- तरतुद करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्रमांक ७५२:-**

औरंगाबाद शहरासाठी ८ डिसेंबर १९८२ रोजी महानगरपालिका स्थापन झाली. सदर महानगरपालिका क्षेत्रात आजमितीस ५३ घोषित झोपडपट्टया आहेत. या ५३ घोषित झोपडपट्टयामध्ये महानगरपालिका घोषित करतांना मुळ नगर पालिका क्षेत्रात समाविष्ट केलेले १८ खेडयांचे गावठाणाचाही समावेश आहे. या वस्त्यांमध्ये अरुंद रस्ते, छोटी घरे असून त्यात आर्थिक दृष्टया कमकुवत गटातील लोकांची प्रमुख्याने वसाहत आहे. त्यामुळे बरीचशी घरे कच्ची आहेत. या घरांसाठी व वस्तीसाठी कोणताही आराखडा मंजुर नसल्याने त्या अनियोजित स्वरुपाच्या वस्त्या आहेत. त्यामुळे या ठिकाणी नागरी सुविधा पुरविणे दुरापास्त होते. एकुणच या वस्तीतील नागरीकांचे जिवनमान उंचावण्याची गरज आहे.

त्यादृष्टीने नागरीकांचे जिवनमान उंचावणे, नागरी सुविधांचा स्तर उंचावणे व वस्तीस एका नियोजित वस्तीचे स्वरुप प्राप्त करुन देणे यासाठी पुणे व पिंपरी चिचवड शहराच्या धर्तीवर औरंगाबाद शहरासाठीही झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण गठीत करणे आवश्यक वाटते.

त्यासाठी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र कायदा १९७१ (Maharashtra Slum Areas (Improveme Clearance and Redevelopment)Act १९७१ **)** चे कलम ३ अे नुसार शासनास असे प्राधिकरण स्थापन करण्याचे अधिकार आहेत. या प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २(१९)(बी) नुसार नियोजन प्राधिकरण म्हणुन मान्यता आहे. त्यामुळे सदर प्राधिकरणास झोपडपट्टी विकासासाठी आवश्यक व सुसंगत विकास नियंत्रण नियमावली तयार करणे तसेच त्याचे विकासावर नियंत्रण ठेवणे हे अधिकार प्राप्त

होतात. त्यातुन या झोपडपट्टयांचा नियोजनबध्द विकास होणे शक्य होईल. तरी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करणेस महाराष्ट्र शासनास विनंती करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौरः- विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र कायदा १९७१ (Maharashtra Slum Areas (Improveme Clearance and Redevelopment) Act १९७१**)** चे कलम ३ अे नुसार शासनास असे प्राधिकरण स्थापन करण्याचे अधिकार आहेत. या प्राधिकरणास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २(१९) (बी) नुसार नियोजन प्राधिकरण म्हणुन मान्यता आहे. त्यामुळे सदर प्राधिकरणास झोपडपट्टी विकासासाठी आवश्यक व सुसंगत विकास नियंत्रण नियमावली तयार करणे त्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करणे तसेच त्याचे विकासावर नियंत्रण ठेवणे हे अधिकार प्राप्त होतात. त्यातुन या झोपडपट्टयांचा नियोजनबध्द विकास होणे शक्य होईल. तरी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनास विनंती करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक :- ७५३**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव सादर करीत आहे की, महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाडेतत्वावर देणे बाबत एकत्रित धोरण ठरविणेसाठी खालील प्रमाणे मुद्दे निहाय सादर करण्यात येत आहे.

**१. रेखाकंनातील खुल्या जागेमधील बांधण्यात आलेले हॉल :-**

मंजुर रेखाकंनामध्ये बांधण्यात आलेल्या हॉलची यादी खालील प्रमाणे :-

| अ.क्र | मोहल्ला | व्यायामशाळा समाज मंदिर सभागृह व मंगल कार्यालय |
|---|---|---|
| १ | कोहिनूर कॉलनी | मो. कोहिनूर कॉलनी, फंक्शन हॉल |
| २ | जसवंतपुरा | बहुउद्देशीय हॉल/ सांस्कृतिक हॉल |
| ३ | कटकट गेट | सभागृह हॉल ( प्रा. शा. सुरु आहे) |
| ४ | शिवराजनगर, शहानूरवाडी | कामगार कल्याण केंद्र |
| ५ | निरंजा को- ऑप. हौ. सो. गारखेडा | सांस्कृतिक सभागृह |
| ६ | एकनाथनगर | समाज मंदिर ( सांस्कृ. हॉल ) |
| ७ | पन्नालालनगर | सांस्कृतिक सभागृह |
| ८ | सहकारनगर | सांस्कृतिक सभागृह |
| ९ | जफरनगर, किराडपुरा | बहुउद्देशीय हॉल |
| १० | जयनगर | टेबल टेनिस हॉल |
| ११ | माजी सैनिक कॉलनी | व्यायामशाळा |
| १२ | म्हाडा कॉलनी, (रेल्वे स्टेशन) | सांस्कृतिक सभागृह |
| १३ | बसैय्येनगर | सांस्कृतिक सभागृह |
| १४ | छत्रपतीनगर ( गारखेडा ) | सांस्कृतिक सभागृह |
| १५ | शहानुरवाडी दर्गा परिसरात | सामाजिक सभागृह |

| | | |
|---|---|---|
| १६ | श्रीनिकेतन कॉलनी | सांस्कृतिक सभागृह |
| १७ | स्वातंत्र्य सैनिक कॉलनी | बहुउद्देशिय हॉल |
| १८ | श्रेयनगर | वीर सावरकर स्मृति सभागृह |
| १९ | रचनाकार कॉलनी | बहुउद्देशिय हॉल |
| २० | सिडको, एन-३,मनपा टेनिस हॉलजवळ | सामाजिक सभागृह |
| २१ | अल्तमेश कॉलनी | सामाजिक सभागृह |
| २२ | समर्थनगर | व्यायामशाळा (वचनपुर्ती हॉल ) |
| २३ | एन-९, सिडको, शिवनेरी कॉलनी | सांस्कृतिक सभागृह |
| २४ | सिडको, एन -६ प्रा. शा. च्या परिसरात | सभागृह |
| २५ | मित्रनगर आकाशवाणी | सांस्कृतिक सभागृह |
| २६ | बन्सीलालनगर | वाचनालय व सांस्कृतिक सभागृह |
| २७ | श्रेयनगर | सामाजिक सभागृह |
| २८ | पडेगाव, माजी सैनिक कॉलनी | सभागृह |
| २९ | झांबड इस्टेट (उस्मानपुरा) | कै . मिनाताई ठाकरे सांस्कृतिक सभागृह |
| ३० | कांचनवाडी | समाज मंदिर |
| ३१ | बारी कॉलनी | सांस्कृतिक सभागृह |
| ३२ | जसवंतपुरा | बहुउद्देशीय हॉल ( सभागृह ) |
| ३३ | एन-९ सिडको | सांस्कृतिक सभागृह |
| ३४ | स्वामी विवेकानंद उद्यान | कारगील स्मारक |
| ३५ | रचनाकार कॉलनी | सभागृह |
| ३६ | एन-५ सिडको | सभागृह |
| ३७ | रचनाकार कॉलनी | सभागृह |
| ३८ | एन-११ हडको | सभागृह |
| ३९ | वेदांतनगर हॉल | बॅडमिंटन हॉल |
| ४० | पगारिया कॉलनी | सांस्कृतिक सभागृह |
| ४१ | राजीवनगर मैदान | सांस्कृतिक सभागृह |
| ४२ | मंजीतनगर | बॅडमिंटन हॉल |
| ४३ | सुराणानगर | सांस्कृतिक सभागृह |
| ४४ | विद्यानिकेतन कॉलनी | सभागृह |
| ४५ | नाथपुरम | बॅडमिंटन हॉल |
| ४६ | विटखेडा | हॉल |
| ४७ | संत गाडगेबाबा व्यापारीसंकुल | मंगलकार्यालय |
| ४८ | पदमपाणी कॉलनी | सभागृह |
| ४९ | पदमपुरा | हॉल |
| ५० | एकनाथनगर उस्मानपुरा | सभागृह |
| ५१ | ज्योतीनगर | वाचनालय |
| ५२ | ज्योतीनगर | बॅडमिंटन हॉल |

| | | |
|---|---|---|
| ५३ | कै.प्रमोद महाजन हडको एन-११ | क्रिडा संकुल |
| ५४ | एन-६ अविष्क्ार कॉलनी | व्यायामशाळा |
| ५५ | एन-६ अविष्क्ार कॉलनी | बॅडमिंटन हॉल |
| ५६ | जसवंतपुरा मस्जिद जवळ | सभागृह |
| ५७ | भोलेश्वर गुलमंडी व्यापारी संकुल | पहिल्या मजल्यावरील हॉल |
| ५८ | भोलेश्वर गुलमंडी | व्यायामशाळा |
| ५९ | राधामोहन कॉलनी खोकडपुरा | सभागृह |
| ६० | समर्थनगर | सभागृह |
| ६१ | भाग्यनगर | सभागृह |
| ६२ | भाग्यनगर | सभागृह |
| ६३ | अशोका रेखांकन | कै.प्रमोद महाजन सभागृह |
| ६४ | आनंदनगर B & C वसाहत | सभागृह |
| ६५ | नागसेन कॉलनी | सभागृह |
| ६६ | बशिर कॉलनी डॉ. रझवीच्या घरासमोर | वाचनालय |
| ६७ | नागेश्वरवाडी | काबरा उद्यान, सभागृह |
| ६८ | विकासनगर | सभागृह |
| ६९ | शक्तीनगर - समर्थनगर | सभागृह |
| ७० | नेहरुपॅलेस भोईवाडा | सभागृह |
| ७१ | झांबेड इस्टेट मिनाताई ठाकरे | सभागृह |
| ७२ | पन्नालालनगर | सभागृह |
| ७३ | जालाननगर | सभागृह |
| ७४ | गारखेडा परिसर चौडेश्वरी गृह निर्माण संस्था | सभागृह |

मनपातर्फे विविध रेखाकंनातील खुल्या जागेमध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार १०% किंवा २०० चौ.मी. जे कमी आहे त्यानुसार महानगरपालिकेच्या फंडातुन किंवा इतर फंडातुन बांधण्यात आलेले हॉल व्यायामशाळा/ सांस्कृतिक हॉल भाडयाने देणे साठी वेळोवेळी मागणी होते. नियमानुसार सदरचे हॉल रेखाकंनातील भुखंड धारकांच्या शिवाय बाहेरच्या व्यक्तीला सदरचे हॉल वापरासाठी देता येत नाहीत. हया हॉलमध्ये काही ठिकाणी मनपाचे वॉचमन नाही त्यामुळे व देखभाल दुरूस्ती वेळोवेळी होत नाही. सदरचे हॉल त्या त्या रेखाकंनातील भुखंड धारकांसाठी असल्यामुळे हे ना नफा ना तोटा या तत्वावर नागरिकांना हस्तांतर करुन त्यांचेवर लाईटबिल देखभाल दुरूस्ती त्यांनी करावी मनपा यामध्ये कोणताही खर्च करणार नाही परंतु ते हॉल सुस्थितीत राहतील याची दक्षता घेण्याची जबाबदारी त्यांचेवर टाकणे योग्य होईल असे मत आहे. यातुन मनपास सद्यस्थितीत कोणतेही उत्पत्र प्राप्त होत नाही.

**२. समाजमंदिर :-**

औरंगाबाद शहरात महानगरपालिकेतर्फे समाजमंदिर / हॉल बांधण्यात आलेले आहे. अशी समाजमंदिरे दाट लोकवस्तीच्या ठिकाणी घोषित झोपडपट्टी भागात गुंठेवारी भागात बांधण्यात आलेली आहे. सदरील समाजमंदिरे / हॉल त्या भागातील नागरिकांचे उपयोगासाठी

बांधलेली असल्याने प्रत्येक हॉलसाठी वॉचमन नेमलेला नसल्याने हॉल सुस्थितीत राहणे आवश्यक आहे.

शहरात बांधण्यात आलेल्या विविध समाजमंदिराची यादी खालील प्रमाणे -

| **अ.क्र** | **मोहल्ला** | **व्यायामशाळा समाज मंदिर सभागृह व मंगल कार्यालय** |
|---|---|---|
| १ | संजयनगर | समाज मंदिर (शिवण केंद्र ) |
| २ | मुकूंदवाडी | समाज मंदिर (बालवाडी ) |
| ३ | मिलींदनगर | सांस्कृतिक सभागृह |
| ४ | रमानगर | सभागृह |
| ५ | शांतीपुरा | समाज मंदिर |
| ६ | मिटमिटा | समाज मंदिर |
| ७ | नक्षत्रवाडी | सांस्कृतिक सभागृह |
| ८ | मुकूंदवाडी आरोग्य केंद्राजवळ | सांस्कृतिक सभागृह |
| ९ | ब्रीजवाडी | सांस्कृतिक सभागृह |
| १० | गौतमनगर, आंबेडकरनगर | सामाजिक सभागृह |
| ११ | मोतीकारंजा | सामाजिक सभागृह |
| १२ | संजयनगर, बायजीपूरा | बहुउद्देशिय हॉल |
| १३ | फुलेनगर, हर्सुल(स्लम) | समाज मंदिर |
| १४ | गारखेडा, प्रियदर्शनी इंदिरानगर | सभागृह |
| १५ | नारेगाव, हनुमान मंदिराजवळ | सांस्कृतिक सभागृह |
| १६ | इंदिरानगर, बायजीपुरा | सांस्कृतिक सभागृह |
| १७ | बेगमपुरा | सभागृह |
| १८ | मोतीकारंजा | बहुउद्देशीय हॉल |
| १९ | शताब्दीनगर | समाज मंदिर |
| २० | हर्सुल | समाज मंदिर |
| २१ | बापू नगर | समाज मंदिर |
| २२ | सिध्दार्थनगर | समाज मंदिर |
| २३ | रविंद्रनगर | समाज मंदिर |
| २४ | शाहबाजार | समाज मंदिर |
| २५ | नागसेन कॉलनी | समाज मंदिर |
| २६ | रोजबाग | समाज मंदिर |
| २७ | गरम पाणी | संस्कार केंद्र |
| २८ | गरम पाणी | धोबी समाजासाठी हॉल |
| २९ | चिकलठाणा | हनुमान मंदिर देविदास भाऊ नवपुते हॉल |
| ३० | संजयनगर बायजीपुरा | सभागृह |
| ३१ | दादाकॉलनी कैलासनगर | सांस्कृतिक सभागृह |
| ३२ | उस्मानपुरा पोलीस चौकी | सांस्कृतिक सभागृह |
| ३३ | बायजीपुरा वार्ड क्र.५१ | व्यायामशाळा |

| | | |
|---|---|---|
| ३४ | सिल्कमिल कॉलनी मंगल कार्यालय | मंगलकार्यालय |
| ३५ | सिल्कमिल कॉलनी | व्यायामशाळा |
| ३६ | राहुलनगर | सभागृह |
| ३७ | हमालवाडा रेल्वेस्टेशन | कामगार कल्याण केंद्र |
| ३८ | क्रांतीनगर | सभागृह |
| ३९ | उस्मानपुरा छोटा मुरलीधरनगर | हॉल |
| ४० | फुलेनगर, उस्मानपुरा | सभागृह |
| ४१ | फुलेनगर, उस्मानपुरा | अभ्यासिका केंद्र |
| ४२ | भिमपुरा उस्मानपुरा | अभ्यासिका केंद्र |
| ४३ | किराडपुरा | रोशा फंक्शन हॉल |
| ४४ | रोशनगेट शाळा नं.१ | सभागृह |
| ४५ | लोटाकारंजा | फंक्शन हॉल |
| ४६ | लोटाकारंजा | मटन मार्केट वरिल हॉल |
| ४७ | हर्षनगर | मनपा व्यापारी सकुलावरील हॉल |
| ४८ | हर्षनगर | सभागृह |
| ४९ | बुढ्ढीलेन | नेहरुभवन |
| ५० | बुढ्ढीलेन | छोटा हॉल |
| ५१ | गौतमनगर, हॉटेल अमरप्रित मागे | सभागृह |
| ५२ | गांधीनगर | सभागृह |
| ५३ | भिमपूरा | समाज मंदिर |
| ५४ | भिमपूरा | सांस्कृतिक सभागृह |
| ५५ | एन-११, सिडको, सौभाग्य मंगल कार्यालयासमोर | सांस्कृतिक सभागृह |
| ५६ | विठ्ठलनगर, सिडको एन-२ | सांस्कृतिक सभागृह |
| ५७ | एन-६, अविष्कार कॉलनी | सामाजिक सभागृह |
| ५८ | चिकलठाणा, | सांस्कृतिक सभागृह |
| ५९ | चिकलठाणा | छत्रपती शिवाजी व्यायामशाळा |
| ६० | रहेमानिया कॉलनी | सभागृह |

ही समाजमंदिरे मागणीनुसार स्वयंसेवी संस्थांना त्यांची कागदपत्रे अनुभव व गुणवत्तेनुसार NGO यांना ना नफा ना तोटा या तत्वावर हस्तांतरित करुन त्यांनी त्याचे लाईटबिल व देखभाल दुरूस्ती करावे व नागरिकांना आवश्यकते नुसार उपलब्ध करुन द्यावे असे मत आहे. यामधुन मनपास सद्यस्थितीत आजपर्यत या प्रकारातुन कोणतेही उत्पन्न प्राप्त होत नाही.

**३. सिडको कम्युनिटी सेंटर**

सदरचे कम्युनिटी सेंटर मनपास सिडकोतर्फे बांधुन सन २००६ मध्ये हस्तांतरित झालेले आहे. ते खालील प्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| १ | सिडको एन-५ | कम्युनिटी सेंटर |
| २ | सिडको एन-२ | कम्युनिटी सेंटर |

| | | |
|---|---|---|
| ३ | सिडको एन-९ एम-२ | कम्युनिटी सेंटर |
| ४ | विठ्ठलनगर एन-२ रामनगर | कम्युनिटी सेंटर |

त्यासाठी त्यांना चालु वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार आर आर प्रमाणे भाडे आकारणी करुन भाडेतत्वावर देणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**Reservatuon & Accomodation या अतंर्गत प्राप्त झालेले हॉलची यादी.**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सिटी प्राईड इमारत जालना रोड | हॉल | राजेद्र हिमंतराव जंजाळ |
| २ | सिटी मार्वल | पहिला मजला, | अध्यक्ष वरखेडेश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट भाडेतत्वावर दिलेला आहे. |
| ३ | सिटी मार्वल | दुसरा मजला | अध्यक्ष वरखेडेश्वरी चॅरिटेबल ट्रस्ट भाडेतत्वावर दिलेला आहे. |
| ४ | जयटॉवर मनपा व्यापारी संकुल | पहिला मजल्यावरिल हॉल | राज्यग्राहक तक्रार मंच यांना भाडेतत्वावर दिलेले आहे. |
| ५ | नुपूर अपार्टमेट | पहिल्या मजल्यावरिल उत्तर बाजुचा हॉल | स्वामी विवेकानंद व्यायामशाळा व क्रिडा मंडळ यांना भाडेतत्वावर देण्यात आलेला आहे. |
| ६ | नुपूर अपार्टमेट | पहिल्या मजल्यावरिल दक्षिण बाजुचा हॉल | रिक्त. |
| ७ | जालना रोड | दुसरा मजला | भरत परसवाणी यांना भाडेतत्वावर देण्यात आलेला आहे. |
| ८ | उल्कानगरी गारखेडा परिसर | पहिला व दुसरा मजला | वार्ड कार्यालय फ सुरू आहे. |
| ९ | गजानन महाराज मंदिर परिसर गारखेडा | रिलायन्स मॉल लगत | १६ हॉल त्यापैकी २ हॉल कृषी विभाग कार्यालय यांना दिलेले आहे. |

यामधील जे हॉल भाडयाने देण्यात येतात त्यांना वेळोवेळी मा.स्थायी समिती मंजुरीने भाडे आकारण्यात येते व वसुली करण्यात येते. मा.उच्च न्यायालयाने आदेश पारित केले आहे की महाराष्ट्र महानगपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ नुसार बाजार मुल्यापेक्षा (R.R. दरापेक्षा) कमी दराने देण्यात येवु नये. त्यानुसार आदेशाचे पालन करणे योग्य व मनपाचे उत्पन्न वाढणेसाठी व Principal of law प्रमाणे पुर्वी कमी दराने दिलेल्या मनपाचे मिळकती भाडयाने दिलेल्या आहेत त्यांना आजपासुन रेडीरेकनरने दराने भाडे आकारणी करणे व वसुली करणे योग्य वाटते तथापि त्यास मान्यता व्हावी.

**५. दुकान केंद्र**

औरंगाबाद शहरातील महानगरपालिकेच्या विविध व्यापारी संकुलाची यादी खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | व्यापारी संकुलाचे नाव | दुकानांची संख्या |
|---|---|---|
| १ | जाफरगेट जुने व्यापारी संकुल | २३ |

| | | |
|---|---|---|
| २ | पीर बाजार व्यापारीसंकुल | ११ |
| ३ | निजामोद्दीन व्यापारी संकुल | १७ |
| ४ | रेल्वे स्टेशन व्यापारी संकुल | २५ |
| ५ | नाथ सुपर मार्केट त.म.व्यापारी संकुल | १२ |
| ६ | नाथ सुपर मार्केट प.म.व्यापारी संकुल | १८ |
| ७ | सादीया मागील व्यापारी संकुल | ५० |
| ८ | सत गाडगे बाबा व्यापारीसंकुल | ४४ |
| ९ | क्रांतीचौक व्यापारी संकुल | ८ |
| १० | भोलेश्वर मार्केट व्यापारी संकुल | २८ |
| ११ | पिया मार्केट त.म.व्यापारी संकुल | ३१ |
| १२ | पिया मार्केट प.म.व्यापारी संकुल | ३१ |
| १३ | नेहरुभवन व्यापारी संकुल | १० |
| १४ | कबाडीपुरा व्यापारी संकुल | १७ |
| १५ | संजयनगर व्यापारी संकुल | ८ |
| १६ | लोटा कारंजा व्यापारी संकुल | ६ |
| १७ | चिकलठाणा जुने व्यापारी संकुल | ६ |
| १८ | चिकलठाणा नविन व्यापारी संकुल | ७ |
| १९ | साईनगर व्यापारी संकुल | २२ |
| २० | जयटॉवर पदमपुरा व्यापारी सकुंल | २२ |
| २१ | नुपूर अपार्टमेंट | ९ |
| २२ | एकनाथनगर | ३० |
| २३ | मालखरे | १ |
| २४ | जाफरगेट झोन खालील | ११ |
| २५ | सब्जीमंडी | ३७ |
| | एकुण | ४८४ |

उपरोक्त प्रमाणे नमुद या दुकानासाठी वेगवेगळया वेळी वेगवेगळी भाडे आकारले आहे. ते त्यानुसार भरणा करित आहे. सन २०११-१२ मध्ये मा.सर्व साधारण सभा ठराव क्र.४२३ दि.७/९/२०११ नुसार मंजुरीने दुकानांना रेडी रेकनरच्या (RR) च्या दिडपट भाडे आकारण्यात आले होते परंतु ते मान्य नसल्याने बरेचशे दुकान धारक कोर्टात गेलेले असुन सन २०११ वर्षापासुन भाडे भरणा कमी प्रमाणात होत आहे. यासर्व गोष्टींना मा.उच्च न्यायालयाचे निर्णयानुसार एकंदर सर्व दुकानांना रेडी रेकनरच्या दराने भाडे आकारणी करणेसाठी मान्यता व्हावी.

**६.निवासस्थाने**

महानगरपालिका कर्मचारी यांचेसाठी शहरात विविध ठिकाणी निवासस्थाने बांधलेली आहे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | निवासस्थानाचे ठिकाण |
|---|---|---|
| १ | सुतार संजय उत्तम | दिल्लीगेट |
| २ | खरे दिपक बाबुलाल | दिल्लीगेट |
| ३ | त्रिभुवन मगन कारभारी | दिल्लीगेट |

| | | |
|---|---|---|
| ४ | तौफीक कुरेशी | दिल्लीगेट |
| ५ | शेख खलिद शेख भिकन | दिल्लीगेट |
| ६ | मगरे प्रकाश तेजराव | दिल्लीगेट |
| ७ | गटकोल राजेंद्र सायन्ना | दिल्लीगेट |
| ८ | पगारे जयश्री विजय | दिल्लीगेट |
| ९ | लाहोट संजय प्रकाश | दिल्लीगेट |
| १० | ढाकणे गंगाधर भाऊलाल | दिल्लीगेट |
| ११ | दुबे विमलबाई पाडुरंग | दिल्लीगेट |
| १२ | लाहोट किताबोकौर प्रकाश | दिल्लीगेट |
| १३ | मांतग कांताबाई बाबुराव | दिल्लीगेट |
| १४ | चाकोते रमेश विश्वनाथ | दिल्लीगेट |
| १५ | पत्की सुधीर मधुकरराव | दिल्लीगेट |
| १६ | काथे ज्योती दगडु | दिल्लीगेट |
| १७ | पगारे बेबी | दिल्लीगेट |
| १८ | माावतकर शकुंतला विष्णु | दिल्लीगेट |
| १९ | कांबळे विलास धोडिंराम | दिल्लीगेट |
| २० | केसरकर प्रियंका | दिल्लीगेट |
| २१ | उणवणे बाबासाहेब | दिल्लीगेट |
| २२ | जरारे संपतराव राघुबा | दिल्लीगेट |
| २३ | पाटील नाना झिप्रु | दिल्लीगेट |
| २४ | मोहम्मद अशफाक | बायजीपुरा |
| २५ | चव्हाण अजय रामदर्शा | बायजीपुरा |
| २६ | दाभाडे शोभा नंदु | बायजीपुरा |
| २७ | पगारे निर्मलाबाई आनंदराव | बायजीपुरा |
| २८ | चव्हाण चंद्रकला दर्यासींग | बायजीपुरा |
| २९ | पगारे दृपदाबाई जयराम | बायजीपुरा |
| ३० | फय्याजखान अब्दुल समद | बायजीपुरा |
| ३१ | नवाब अली मुघल अली | बायजीपुरा |
| ३२ | पवार सुधाकर रामा | बायजीपुरा |
| ३३ | हटवाल बिरमती करमवीर | बायजीपुरा |
| ३४ | पगारे निर्मलाबाई काकाराव | बायजीपुरा |
| ३५ | मिसाळ कैलास बाजीराव | बायजीपुरा |
| ३६ | मगरे विनोद छगन | बायजीपुरा |
| ३७ | सईदा बेग मेहबुब बेग | बायजीपुरा |
| ३८ | कांबळे गौतम | बायजीपुरा |
| ३९ | जैाबी अहेमद बेग | बायजीपुरा |
| ४० | मयत | बायजीपुरा |
| ४१ | रगडे भरत कोंडीराम | बायजीपुरा |

| | | |
|---|---|---|
| ४२ | डेरे रुक्मणबाई | बायजीपुरा |
| ४३ | ताहेरा बेगम | बायजीपुरा |
| ४४ | शेख रऊफ शेख अ.करिम | बायजीपुरा |
| ४५ | हॅाशील सुरेश रंगशाथ | बायजीपुरा |
| ४६ | अब्दुल अजीम अ. रऊफ | बायजीपुरा |
| ४७ | दाभाडे रमेश भिकाजी | बायजीपुरा |
| ४८ | सय्यद अकबर सय्यद जमाल | बायजीपुरा |
| ४९ | शेख शाहेद शेख निझाम | बायजीपुरा |
| ५० | मोहम्मद शफीक मो. रफिक | बायजीपुरा |
| ५१ | अब्दुल अलीम अ.हसीब | बायजीपुरा |
| ५२ | गवळी एकनाथ उत्तमराव | बायजीपुरा |
| ५३ | साळवे शोभाबाई सुखदेव | बायजीपुरा |
| ५४ | शेजुळ किशोर शेषराव | बायजीपुरा |
| ५५ | सोनवणे गयाबाई सुर्यभान | बायजीपुरा |
| ५६ | सातपुते संगीता गणपत | बायजीपुरा |
| ५७ | शेख असलम शेख रहेमान | बायजीपुरा |
| ५८ | हफीजाबी फजल | बायजीपुरा |
| ५९ | म्हस्के रमेश मोतीराम | बायजीपुरा |
| ६० | कांबळे केतन बळीराम | बायजीपुरा |
| ६१ | धिल्लोड धरमवीर | बायजीपुरा |
| ६२ | नरवडे विजय तुकाराम | बायजीपुरा |
| ६३ | मयत | बायजीपुरा |
| ६४ | हिवराळे शिला गोपीनाथ | बायजीपुरा |
| ६५ | तुपे कैलास विश्वनाथ | बायजीपुरा |
| ६६ | तुपे संजय विश्वनाथ | बायजीपुरा |
| ६७ | नवगीरे रामबाई गणपत | भडकलगेट |
| ६८ | चिस्ती मसलोद्यीन | भडकलगेट |
| ६९ | गायकवाड गणेश सिताराम | भडकलगेट |
| ७० | डुकरे भाऊराव भिकाजी | भडकलगेट |
| ७१ | रोकडे बी.एच | भडकलगेट |
| ७२ | अब्दुल शफिक सिद्यीकी | भडकलगेट |
| ७३ | मयत | भडकलगेट |
| ७४ | दाभाडे आशाबाई देवदास | भडकलगेट |
| ७५ | साळवे सुरेश | भडकलगेट |
| ७६ | अब्दुल रफीक अ.अजीज | भडकलगेट |
| ७७ | अब्दुल नसीर अ. अजीज | भडकलगेट |
| ७८ | खंडागळे तात्याराव | भडकलगेट |
| ७९ | मगरे गणेश छगन | भडकलगेट |

| | | |
|---|---|---|
| ८० | कोमु राजय्या कृष्णा स्वामी | भडकलगेट |
| ८१ | लोखंडे कौतीक श्रीराम | भडकलगेट |
| ८२ | फिरोजखान मो.नियजखान | भडकलगेट |
| ८३ | गायकवाड किरण | कांचनवाडी |
| ८४ | रणयेवले पप्पुलाल | कांचनवाडी |
| ८५ | बोंराडे मनोज दामोदर | कांचनवाडी |
| ८६ | मिसाळ अनिल अंबादास | कांचनवाडी |
| ८७ | खरात संजय भाऊराव | कांचनवाडी |
| ८८ | खरात सांडु आनंदा | कांचनवाडी |
| ८९ | खोमणे उत्तमराव बाबूराव | कांचनवाडी |
| ९० | मिसाळ सुनिल अंबादास | कांचनवाडी |
| ९१ | म्हस्के पांडुरंग जीवनाजी | कांचनवाडी |
| ९२ | सुर्यवंशी सत्यनारायण | कांचनवाडी |
| ९३ | सेवा निवृत्त | कांचनवाडी |
| ९४ | अहेरकर शोभा मिठठु | राहुलनगर |
| ९५ | मगरे विजय भिमराव | राहुलनगर |
| ९६ | शुक्ला जगदीश | राहुलनगर |
| ९७ | निकम रमेश भिकाजी | राहुलनगर |
| ९८ | रगडे राजु येडुबा | राहुलनगर |
| ९९ | रगडे विजय येडुबा | राहुलनगर |
| १०० | पवार रामदास विश्वनाथ | राहुलनगर |
| १०१ | पवार कैलास गंगाराम | राहुलनगर |
| १०२ | गोसावि सुरेश | कोटला |
| १०३ | खरात रतन तोताराम | कोटला |
| १०४ | बनसोडे रमेश रायभान | कोटला |
| १०५ | शेख परवेज शेख बाबु | कोटला |
| १०६ | बदरुनिशा शहाणा | कोटला |
| १०७ | तायडे सचिन रुपचंद | कोटला |
| १०८ | साठे राजु देवराव | कोटला |
| १०९ | भळसा णे रमाकांत | एन-५ |
| ११० | लाहोट मंगलसिंग | एन-५ |
| १११ | चोदोरे मोहा | एन-७ |
| ११२ | जेजुरकर संजय | N-७ |
| ११३ | शमीमबी रहेमान बेग | स.केद्र |
| ११४ | मेमबुब बेग मेहमुद बेग | स.केद्र |
| ११५ | शेख युसुफ शेख मेहमुद | नेहरुभवन |
| ११६ | अखिल अहेमद | नेहरुभवन |
| ११७ | जाधव शिवनाथ तुकाराम | जिन्सी |

| | | |
|---|---|---|
| ११८ | सोनवणे प्रभाकर लक्ष्मण | जिन्सी |
| ११९ | बोरडे संगीता उत्तम | जिन्सी |
| १२० | गवळे अशोक केरुबा | जिन्सी |
| १२१ | मोहम्मद जहुर मो.हमीद | शहागंज |
| १२२ | पाटील नयासिंग | शहागंज |
| १२३ | सय्यद  हलीम स. अजीज | शहागंज |
| १२४ | जाधव विजय बंसी | पैठणगेट |
| १२५ | पवार बालाजी शकंर | पैठणगेट |
| १२६ | दांडगे आत्माराम पांडुरंग | गायमुख |
| १२७ | साळवे उत्तम गोविंद | गायमुख |
| १२८ | मद्यी नारायण लक्ष्मण | ज्युब्ली पार्क |
| १२९ | चव्हाण मथुराबाई रमेश | ज्युब्ली पार्क |
| १३० | गडप्पा अंजनाबाई | ज्युब्ली पार्क |
| १३१ | वाघ लता रणजित | ज्युब्ली पार्क |
| १३२ | पवार रमेश नामदेव (मयत) | ज्युब्ली पार्क |
| १३३ | पवार अनिल नामदेव | ज्युब्ली पार्क |
| १३४ | गायकवाड निर्मलाबाई काशीनाथ | विद्यापीठ |
| १३५ | गंगावणे रविंद्र गोविंदराव | विद्यापीठ |
| १३६ | मोरे दिलीप शेकुजी | विद्यापीठ |
| १३७ | दिपक आर पारधे | विद्यापीठ |
| १३८ | मातंग राजु बाबुराव | फुलेनगर |
| १३९ | पचौरी मंगलाबाई | सिध्दार्थ उद्यान |
| १४० | निकाळजे राजेंद्र दौलतराव | सिध्दार्थ उद्यान |
| १४१ | मोहमद झिया निझाम | सिध्दार्थ उद्यान |
| १४२ | शेंडगे मारोती नामदेव | सिध्दार्थ उद्यान |
| १४३ | अब्दुल खलील | सिध्दार्थ उद्यान |
| १४४ | शेख हफीज शेख हनीफ (मयत) | सिध्दार्थ उद्यान |
| १४५ | नवपुते जगन्नाथ गोपीनाथ | चिकलठाणा |
| १४६ | कुलकर्णी सतीष दिगंबर | नागेश्वरवाडी |
| १४७ | तडवी सलीम गुलाम | क्रांतीचौक |
| १४८ | सोहेल एकबाल खान | कटकटगेट |
| १४९ | गायकवाड                    मयत | प्रगती कॉलनी |
| १५० | जाधव जनार्धन सदाशिव | औरंगपुरा |
| १५१ | निकम जिजाबाई नारायण | पदमपुरा |
| १५२ | भुल दलबहादुर | एन-११ |
| १५३ | शेख खमर अब्दुल शकुर | ज्युब्ली पार्क |
| १५४ | रमेश पवार | ७ हिल |
| १५५ | बोरडे किशोर | दिल्लीगेट |

| | | |
|---|---|---|
| १५६ | कारके भगवान | हर्सुल |
| १५७ | गायकवाड प्रकाश गोविंदराव | कोटला |
| १५८ | सोनवणे समिद्राबाई | बायजीपुरा |
| १५९ | शिंदे कासाबाई | पदमपुरा फा-स्टे |
| १६० | मोहम्मद शरीफ मो.याकुब | Zoo |
| १६१ | शेख रफीक शेखअमीर | Zoo |
| १६२ | कारके कैलास | रोजाबाग |
| १६३ | बाकर चंद्रकलाबाई रामभाऊ | बायजीपुरा |

सदरील निवासस्थाने महानगरपालिकेचे अधिकारी / कर्मचारी यांचे मागणीनुसार मान्यतेनंतर वाटप करण्यात येतात व त्याचे भाडे शासनाच्या निर्देशानुसार आकारण्यात येतात.

**७. मैदाने**

सिडको व मनपा क्षेत्रात खालील प्रमाणे मैदाने आहेत.

| अ.क्र. | मोठे मैदान |
|---|---|
| १ | टिव्ही सेंटर मैदान |
| २ | रामलीला मैदान |
| ३ | फरशी मैदान |
| ४ | राजीव गांधी मैदान |

सदरील मैदाने नागरिकांच्या मागणीनुसार सार्वजनिक कार्यक्रमासाठी चालु वर्षाच्या रेडीरेकनर दराने भाडेनिश्चिती करुन भाडयाने देणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**८. आठवडी बाजार :-**

औरंगाबाद शहरात विविध ठिकाणी खालील प्रमाणे तीन आठवडी बाजार सुरू आहे.

१. जाफरगेट आठवडी बाजार - निविदा पध्दतीने वसुली करिता देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. चिकलठाणा आठवडी बाजार - निविदा पध्दतीने प्रति बाजार वसुली करिता देणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

३. शहानुरमिया दर्गा आठवडी बाजार - सदरील आठवडी बाजार बीओटी तत्वावर चालविणे करिता तीस वर्ष मुदतीकरिता देण्यात आलेले आहे. मुदत संपल्यानंतर सदरील बाजार मनपाकडे हस्तातंर होणार आहे.

**९. वाहनतळ:-**

शहरात विविध ठिकाणी वाहनतळ असुन ते खालील प्रमाणे -

१. नागेश्वरवाडी - निविदा पध्दतीने देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

२. गुलमंडी - निविदा पध्दतीने देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

३.पैठणगेट -निविदा पध्दतीने देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

४.सलीमअली सरोवर उद्यान - मनपाकर्मचा-या मार्फत पार्किंगची वसुली केली जाते.

**१० होर्डींग :-**

औरंगाबाद शहरात एकुण खाजगी व मनपा जागेवर ३४८ जाहिरात फलकांना महानगरपालिकेतर्फे परवाना देण्यात आलेला आहे त्याचे दर रु.५३.५८/प्रतिमहा/चौ.मी. याप्रमाणे

असुन हे दर २००३ साली पासुन असुन याबाबत महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्यासाठी सदरील जुन्या प्रचलीत दरात २५% वाढ करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

जाहिरात कराची प्रभावीपणे वसुली होण्यासाठी खाजगी वसुली अभिकर्ता नेमण्याची निविदा काढण्यात आली असुन निविदा मंजुरी नंतर अभिकर्ता नेमण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

शहरातील विना परवाना होर्डींग, जाहिरात फलक, बोर्ड, बॅनर, झेंडे, शुभेच्छा फलक वेळोवेळी काढण्यासाठी मा.उच्च न्यायालयाने आदेशानुसार उप आयुक्त दर्जाचे नोडल ऑफीसर व संबधित वार्ड अधिकारी यांचे वर जबाबदारी देण्यात आलेली आहे.

**११. मंगल कार्यालय:-**

औरंगाबाद शहरात लग्नसमारंभासाठी मंगल कार्यालय खालीलप्रमाणे

**कै.पुंडलिकराव ताठे मंगल कार्यालय-** मनपातर्फे नागरिकांच्या मागणीनुसार व महानगरपालिकेतर्फे निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार हॉल भाडयाने देण्यात येते.

**मेघावाले मंगल कार्यालय -** मनपातर्फे नागरिकांच्या मागणीनुसार व महानगरपालिकेतर्फे निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार हॉल भाडयाने देण्यात येते.

**सिल्कमिल कॉलनी -** मनपातर्फे नागरिकांच्या मागणीनुसार व महानगरपालिकेतर्फे निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार हॉल भाडयाने देण्यात येते.

**नेहरुभवन -** मनपातर्फे नागरिकांच्या मागणीनुसार व महानगरपालिकेतर्फे निश्चित करण्यात आलेल्या दरानुसार हॉल भाडयाने देण्यात येते.

सदर मंगल कार्यालये निविदा पध्दतीने चालविणेसाठी तीन वर्षाच्या मुदतीवर देणे बाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**१२.लिजवर दिलेल्या जागा व नाल्याच्या लिजवरील जागा :-**

औरंगाबाद शहरात मागील २५ ते ३० वर्षापुर्वी नाला जमिनी लिजवर देण्यात आलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे नाला जमिनी लिजवर देण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | लीजधारकाचे नाव | मोहल्ला | क्षेत्रफळ चौ.मी. | कालावधी/ वर्ष |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ६ |
| १ | शिशु विकास महिला मंडळ | उस्मनापुरा | | ३० |
| २ | बॉम्बे मर्कटाईल बॅक | जुना बाजार | १२९४ चौ.मी. | ९० |
| ३ | पिपल को-ऑप. बॅक | टिळकपथ | ८२२ चौ.मी. | ९० |
| ४ | प्रेमचंद सुराणा | टिळकपथ | ३००० चौ.मी. | ९० |
| ५ | सारस्वत बॅक | नागेश्वरवाडी | १०५३ चौ.मी. | ९९ |
| ६ | प्रेसिडेंट, ज्योती नगर डेव्ह. | ज्योती नगर | १०० चौ.मी. | |
| ७ | प्रेसिडेट, देशमुख नगर विकास संस्था | दशमेशनगर | १४२.७ चौ.मी. | ९९ |
| ८ | सतिश प्रकाश लाहोट | उस्माानपुरा | १०२ चौ.मी. | ३० |
| ९ | रुपचंद गिरधारीलाल | उस्मानपुरा | १०२ चौ.मी. | ३० |
| १० | लखा पहेलवान जिमखाना | जाधववाडी | १६७.२८ चौ.मी. | ३० |
| ११ | चैतन्य गृह निर्माण संस्था | गारखेडा | २१३८ चौ.मी. | ३० |
| १२ | कुशिनारा मागासवर्गीय गृह निर्माण | बायजीपुरा, सेंट्रल | २५७५ चौ.मी. | ९९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | संस्था | नाकाजवळ, जसवंतपुरा | | |
| १३ | प्रेसिडेट, समर्थ महिला मंडळ | समर्थनगर | २५ चौ.मी. | ३० |
| १४ | डॉ. जावेद नवाज | सब्जीमंडी, शॉपींग कॉम्प्लेक्स ( टेरेस ) | १४३ चौ.मी. | ३० |
| १५ | त्रिवेणी को. ऑप हौ. सो. | कटकट गेट | ३५२२ चौ.मी. | ९९ |
| १६ | बिसमिल्ला बी व इतर पाच | सब्जीमंडी, शॉपींग कॉम्प्लेक्स | १०७.०६ चौ.मी. | ३० |
| A | हाजी नूर मो. पि. हाजी इस्माईल कुरेशी १. जुलेखा कुरेशी २. इस्माईल कुरेशी | | १११.५१ चौ.मी. | ३० |
| B | हसीना बी अजीम खान | | ४४.६० चौ.मी. | ३० |
| C | कौसर यासीन | | ३२.६२ चौ.मी. | ३० |
| १७ | मोहन बोंबले, सेंकेंटरी जय बजरंग जिमखाना, सी.टी.एस. २०५९६/पी | समर्थनगर | २५ चौ.मी. | ५ |
| १८ | मराठा सेवा मंडळ | टिळकपथ | ३७२ चौ.मी. | ९९ |
| १९ | बाईसाहेब प्रयागधाम ट्रस्ट | गोविंदनगर | ७९९.५० चौ.मी. | ३० |
| २० | जाहेद हसन खान | लोटा कारंजा | २८.६५ चौ.मी. | ३० |
| २१ | मिर्झा मुस्ताफा बेग | जाफरगेट | २७९ चौ.मी. | ३० |
| २२ | विवेकानंद कॉलेज | समर्थनगर | ४४३४.७० चौ.मी. | |
| २३ | एस. एम. खान | रेल्वे स्टेशन | २७० चौ.मी. | ९९ |
| २४ | मधुकर येंझे | जाफरगेट | १२४.९० चौ.मी. | |
| २५ | ढोकरजी, चेत्राम पुलवडे व राधाकिसन पिंपळे | चुडी बाजार | १९.३ व ८ चौ.मी. | |
| २६ | मुरलीधर गवळी | एस. बी. कॉलनी | १०.२ चौ.मी. | |
| २७ | पृथ्वीराज पवार | सिध्दार्थ गार्डन मागे | | |
| २८ | समर्थ कृपा एस.जी. एन. संस्था | गारखेडा | २०० चौ.मी. | |
| २९ | साप्ताहिक पोलीस टाईम्स | समर्थनगर | २७.९० चौ.मी. | ३० |
| ३० | एम. एस. ई. बी | पन्नालालनगर | ५५२५ चौ.मी. | |
| ३१ | आनंदीबाई गादीया | बारुदगरनाला | १९०० चौ.मी. | ९९ |
| ३२ | औरंगाबाद जिल्हा मराठी पत्रकार परिषद | समर्थनगर | १२९० चौ.मी. | २९ |
| ३३ | शिवाई सेवा ट्रस्ट | औरंगपुरा नाला समर्थनगर | १२२० चौ.मी. | ३० |
| ३५ | जीवन कला मंडळ | यु समर्थनगर | १११.३ चौ.मी. | ३० |
| ३६ | औषधी भवन | दलालवाडी | ६८४ चौ.मी. | ९९ |
| ३७ | राणी लक्ष्मीबाई महिला कल्याण मंडळ | निजामुद्दीन दर्गा | ५४० चौ.फुट | ३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | रोड, मनपा शॉपीग कॉम्प्लेक्स टेरेस | | |
| ३८ | मराठवाडा युथ बॉडी बिल्डर असो. | समर्थनगर | | |
| ३९ | सुरजितसिंग खुंगार | उस्मानपुरा | २०.५४ चौ.मी. | ५ |
| ४० | प्रेसिडेट, सारंग सोसायटी | गारखेडा | २०० चौ.मी. | ३० |
| ४१ | जोशी संजय, प्रेसिंडेंट विकली न्यूज पेपर | मालजीपुरा, सीटीएस. नं. २०६४८ | २७.०८ चौ.मी. | ३० वर्ष |
| ४२ | से. डिस. आर्म रेसलींग असो. | उस्मानपुरा | | |

नाल्यावरिल जमीनी लिजवर देवुन बरीच वर्ष झालेली आहेत. त्यांचे लिज करारनामा चेक करणे, लिजरेंट वाढविता येतो काय? तपासणे ब्रीचअप करारनामा केले काय? इत्यादी गोष्टी तपासणे आवश्यक आहे त्यासाठी Well Educated Staff ची आवश्यकता आहे / खाजगी C.A.व Advocate यांची नेमणुक करुन तपासणी करुन घेणे योग्य राहील.

याजागा लिजवर दिलेल्या आहे. त्यासाठी सर्व संचिकेचा अभ्यास करुन लिज भाडे वाढविणे , Breach of Aggrement आहे का? वापस जागा घेता येईल काय इत्यादी बाबीचा अभ्यास करणे करिता C.A. व Advocate नेमणुक करुन कार्यवाही सुरू केली आहे.

**१३. नाटयगृह**

औरंगाबाद शहरात मनपाचे दोन नाटयगृह असुन ते खालील प्रमाणे आहे.

१. सिडको नाटयगृह -
२. संत एकनाथ रंगमंदिर

सद्यस्थितीत सदरील नाटयगृहाचे मनपाकडे व्यवस्थापन असुन दोन्ही सुस्थितीत आहे. तथापि यावर होणारा विद्युत देयकावरील खर्च, कर्मचारी खर्च, देखभाल दुरूस्ती इ. पाहता तसेच यापासुन महानगरपालिकेस प्राप्त होणारे उत्पन्न व त्यावर होणारा खर्च याचे अवलोकन केले असता महानगरपालिकेचे नुकसान होत असुन याकरिता निविदा काढुन खाजगी अभिकर्त्यास नाटयगृह चालविण्यास देणेकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

**१४. गॅन्ट्रीज :-**

शहरात विविध मुख्य रस्त्यावर बीओटी तत्वावर गॅन्ट्रीज उभारण्यात आलेल्या असुन एकुण २१ गॅन्ट्रीज सद्यस्थितीत आहे. या करिता निविदा मागवुन एजन्सी निश्चित करणे योग्य राहील.निविदा अंतिम होई पर्यत जुन्या एजन्सी धारका मार्फत जाहिरात कर वसुल करणे योग्य.

**१५ शहर बसथांबे :-**

शहरात मुख्य रस्त्यावर ४१ शहर बसथांबे बीओटी तत्वावर उभारण्यात आलेले असुन सदरील बस थांबे पासुन जाहिरात उत्पन्न मिळणेसाठी या वर्षी तीनवेळा निविदा मागवुनही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे यासाठी एजन्सी मार्फत ऑफर मागविणे योग्य व त्यामध्ये Face Lifting करणेसाठी तरतुद ठेवणे करिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

करिता मा. सर्वसाधारण सभेसमोर धोरण निश्चित करणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

**संवाद:-**

श्री.अशोक बेहडे :क्रमांक २ वर ज्या मिळकती दिल्यात त्यात काही मिळकतीची नावे आलेली नाही.

श्री.काशिनाथ कोकाटे :जी यादी दिली त्यात क्रमांक १ अपुर्ण आहे क्र.२ जे जे हॉल बांधलेले आहे ते काही संस्थांना भाडेतत्वावर दिलेले आहे.ते देतांना मूळ उद्दिष्ट काय होते उदा कोहीनूर कॉलनी येथे फंशन हॉल आहे ते कोणत्या परपज साठी आहे. गोलमोल प्रस्ताव ठेवलेला आहे सविस्तर माहिती सह असावे. जी यादी दिली त्या ठिकाणचे प्रत्यक्ष मोजमाप करून सादर केले का?

श्री.रेणुकादास वैद्य :अनेक वार्डात नागरी वसाहतीमध्ये सभागृह,हॉल आहेत. ते तयार केल्यानंतर भाडेपट्टेवर दिले नाही तेथे मोकाट कुत्रे उपद्रव करून ठेवतात अनेक लोक पत्ते खेळतात, दारू पितात असे अवैध वापर तेथे होतो. हे सभागृह रिकामे न ठेवता त्या कॉलनीतील संस्था असेल संस्थेचे व्यक्ती असेल किंवा संस्था व सदस्यांच्या शिफारशीनुसार कुणालातरी देखभाल दुरूस्तीसाठी चालवायला दिले पाहिजे. ते लाईट बील भरणार, देखभाल करणार. लग्नासाठी, वाढ दिवस, इतर कार्यक्रमासाठी दयायचे की नाही संस्थेला अधिकार दिला पाहिजे. महापालिकेला उत्पन्न मिळावे म्हणून बांधलेले नाही तर त्या भागातील नागरीकांना सुविधा मिळण्यासाठी केलेले आहे.नाममात्र भाडे १०००रू महिना प्रमाणे त्या त्या भागातील संस्थेला देण्यात यावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :संस्थेला देण्यास हरकत नाही परंतु या अगोदर ज्या परपज साठी सभागृह, हॉल दिले त्याची यादी मागवावी.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.अफसर खान :कुणासही दिले तरी व्यवसाय करतात. देण्याची गरज नाही

श्री.कृष्णा बनकर :स्लम भागात समाजमंदीर हॉल तेथ्ील नागरीकांना मोफत वापरासाठी देण्यात यावे.

श्री.मोहन मेघावाले :ज्या परपज साठी ते बांधण्यात आले ते कार्यक्रम वर्षातून एक-दोन वेळेस होतात.तेथील वापरात बदल करावा तसेच माझ्या वार्डात मनपा शाळेच्या बाजूला सभागृह आहे त्याचा उल्लेख यात आलेला नाही तो करावा.

सौ.किर्ती शिंदे :ज्यांना वापरासाठी देणार त्यांना त्या वार्डाचे स.सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक करावे तसेच आजुबाजूच्या नागरीकांना त्रास होणार नाही अशांनाच ते वापरासाठी देण्यात यावे.

श्री.कृष्णा बनकर :स्लम भागातील नागरीकांना समाजमंदीर सभागृह असतील ते मोफत वापरासाठी देण्यात यावे.

श्री.मीर हिदायत अली :आताच कर वाढीच्या प्रस्ताव मंजूर केला त्यात उपभोक्ता कर आकारला एकीकडे कर वाढवतो व दुसरीकडे कोटयावधीच्या जागेवर असलेले हॉल सभागृह नाममात्र भाडेने देतो हे योग्य वाटते का ? ज्यांना दिले ते भाडे भरणा करीत नाही ते तेथे व्यवसाय करतात एका

कार्यक्रमासाठी १०-१० हजार रूपये घेतात पैसे कमवित आहे महापालिकेला कर व भाडे भरणा करीत नाही योग्य निर्णय घ्यावा.

श्री.किशोर नागरे :ज्या मालमत्ता ज्यांना दिल्या ते भाडे भरतात की नाही दर तीन वर्षानंतर आढावा घेण्यात यावा.

श्री.गिरजाराम हाळनोर :यात ज्योतीनगरच्या दोन हॉलचा उल्लेख नाही तो करावा. ज्योतीनगर मध्ये एक जागा ९९ वर्षाच्या करारावर भाडेपट्टेने दिलेली होती यात उल्लेख आलेला नाही तो करण्यात यावा.

मा.उपमहापौर :ज्या जागा यात दिलेल्या आहे त्या सोसायटीच्या ओपनस्पेस आहेत. त्या जागेवर अधिकार त्या सोसायटीचा असतो.सोसायटीने ठरवायचे.

श्री.मीर हिदायत अली :यापुर्वी संस्थेला जागा दिल्या लाखो रूपये कमवित आहे. श्रीमान श्रीमती दुकान नाल्याची जागा दिली.अनेक ठिकाणच्या जागा ६ हजार रूपये महिना प्रमाणे दिल्या.यात मनपाचे नुकसान होत आहे.

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.समीर राजूरकर :भुईवाडा भागात ओपनस्पेसवर हॉल आहे तेथे अवैध धंदे चालतात. तेथील वसाहतीमधील नागरीकांना तो हॉल १०००रू प्रमाणे भाडे तत्वावर देण्यात यावा सतत मागणी करतो परंतु २५ हजार रेडी रेकनर प्रमाणे होतात असे सांगितले जातात एवढी रक्कम कोणी देणार नाही अशा मिळकती भाडे तत्वावर देणे बाबत विचार व्हावा.जे कमर्शियल वापर करतील त्यांचेवर कार्यवाही करावी.

मा.महापौर :त्या भागातील नागरिकांसाठी उपयोग व्हावा तसेच ओपन स्पेसवर अतिक्रमण होऊ नये म्हणुन हॉलचा विषय घेतलेला आहे. स्थानिक नागरिक किंवा संस्थेस सभागृह/हॉल प्रतिमाह १०००/- रुपये आकारून भाडेतत्वावर देण्यात यावे. लाईट बिल त्या-त्या संस्थेने/नागरिकांनी भरावे. देखभाल व दुरूस्ती संबंधीताने करावे. यापुर्वी रेखांकनातील जे हॉल/बांधकामे भाडेतत्वावर देण्यात आलेले आहेत त्याचे पुर्वीप्रमाणेच नवीन करारनामे करण्यात यावे.

महानगरपालिकेचे दुकाने किंवा गाळे रेडी रेकनर प्रमाणे भाडेतत्वावर दिल्यास प्रतिसाद मिळत नाही. करीता जाहीर प्रगटनाद्वारे निविदा काढण्यात याव्यात. परंतु यापुर्वी ज्या हॉलची मागणी झालेली आहे, त्यांना यातून वगळण्यात यावे.

मैदाने- मोकळी मैदाने याचे ११०००/- रुपये भाडे घेण्यात यावे.

जी मंगल कार्यालये याआधी भाडेतत्वावर दिलेले आहेत ते वगळून इतरांची निविदा प्रक्रिया करावी. निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत ज्या पध्दतीने चालू आहे त्याप्रमाणे भाडे आकारणी करण्यात यावी. याआधीचा सन २०१० चा सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक १०३५ रद्द करण्यात येतो.

निवासस्थान समितीमार्फत ज्येष्ठतेनुसार निवासस्थाने देण्यात यावीत व महानगरपालिकेच्याच कर्मचाऱ्यांना देण्यात यावीत. जे

कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांच्याकडून निवासस्थान रिकामे करून घेण्यात यावे.

होर्डींगच्या निविदा नव्याने काढण्यात यावेत. केवळ दरवसुलीसाठीचे नसून होर्डींग्ज लावण्यासाठीही असावे. नवीन होर्डींग्ज बी.ओ.टी. तत्वावर द्यावेत.

संत एकनाथ व संत तुकाराम ही नाट्यगृहे खाजगीकरण करण्यात यावे.

श्री.कृष्णा बनकर :संत एकनाथ व संत तुकाराम ही नाट्यगृहे खाजगीकरण करण्यात येऊ नये.

श्रीमती रेखा जैस्वाल :नाट्यगृहाचे खाजगीकरण करण्यात येऊ नये.

श्री.अफसर खान :नाट्यगृहाचे खाजगीकरण करण्यात येऊ नये.

श्री.खाजा शरफोद्दीन :नाट्यगृहाचे खाजगीकरण करण्यात येऊ नये.

मा.महापौर :संत एकनाथ व संत तुकाराम ही नाट्यगृहे खाजगीकरणबाबतचा विषय सध्या बाजुला ठेवून बाकीचा विषय दुरुस्तीसह मंजूर करण्यात येतो.

श्री.गिरजाराम हाळनोर :ज्या ठिकाणी सोसायटीमध्ये ओपनस्पेस ठेवल्या तेथे हॉलीबॉल, क्रिकेट व इतर खेळ होतात किंवा ट्रेनिंग दिल्या जाते अशा जागेचे भाडे घेण्याचा ठराव यापुर्वी मंजूर केला तो रद्द करावे. खेळाडूंना प्रोत्साहन दयावे.

मा.महापौर :जी ओपनस्पेस आहे तेथे मुले खेळतात त्याचा कोणताही मोबदला घेवू नये. तसा ठराव केला असेल तर तो रद्य करावा.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपाच्या मालमत्ता भाडेतत्वावर देणेकरीता धोरण ठरविण्यासंबंधीच्या प्रस्तावास दुरूस्तीसह मान्यता देण्यात येते.

१. रेखांकनातील खुल्या जागेमधील बांधण्यात आलेले हॉल स्थानिक नागरिक किंवा संस्थेस सभागृह/हॉल प्रतिमाह १०००/- रुपये आकारून भाडेतत्वावर देण्यात यावे. लाईट बिल त्या त्या संस्थेने/नागरिकांनी भरावे. देखभाल व दुरूस्ती संबंधीताने करावे. यापुर्वी रेखांकनातील जे हॉल/बांधकामे भाडेतत्वावर देण्यात आलेले आहेत त्याचे पुर्वीप्रमाणेच नवीन करारनामे करण्यात यावे.
२. समाज मंदीर मागणी नुसार स्वयंसेवी संस्थांना/एनजीओ यांना प्रतिमाह १०००/- रुपये आकारून समाजमंदीर/सभागृह भाडेतत्वावर देण्यात यावे. लाईट बिल भरणे व देखभाल दुरूस्ती करणे ही कामे संबंधीताने करावीत तसेच नागरिकांना आवश्यकतेनुसार उपलब्ध करून द्यावेत.
३. सिडको कम्युनिटी सेंटर हे प्रशासनाने प्रस्तावित केल्याप्रमाणे भाडे आकारणी करून भाडे तत्वावर देण्याची कार्यवाही करावी.
४. Reservation & Accomodation या अंतर्गत प्राप्त झालेले हॉलची यादी महानगरपालिकेचे दुकाने किंवा गाळे रेडी रेकनर प्रमाणे भाडेतत्वावर दिल्यास प्रतिसाद मिळत नाही. करीता जाहीर प्रगटनाद्वारे निविदा काढण्यात याव्यात. परंतु यापुर्वी ज्या हॉलची मागणी झालेली आहे, त्यांना यातून वगळण्यात यावे.
५. दुकान केंद्र प्रस्तावित केल्याप्रमाणे सर्व दुकानांना रेडी रेकनरच्या दराने भाडे आकारणी करण्यात यावी.

६. निवासस्थाने हे निवासस्थान समिती मार्फत ज्येष्ठतेनुसार निवासस्थाने देण्यात यावीत व महानगरपालिकेच्याच कर्मचाऱ्यांना देण्यात यावीत. जे कर्मचारी सेवानिवृत्त झाले त्यांच्याकडून निवासस्थान रिकामे करून घेण्यात यावे.
७. मैदानासाठी प्रतिकार्यक्रम रुपये ११०००/- आकारणी करावी.
८. आठवडी बाजाराचे प्रस्तावित केल्याप्रमाणे निवीदा पध्दतीने वसुलीची कार्यवाही करावी.
९. वाहनतळाचे प्रस्तावित केल्याप्रमाणे निवीदा पध्दतीने वसुलीची कार्यवाही करावी.
१०. होर्डीगच्या निविदा नव्याने काढण्यात यावेत. केवळ दरवसुलीसाठीचे नसून होर्डीग्ज लावण्यासाठीही असावे. नवीन होर्डीग्ज बी.ओ.टी. तत्वावर द्यावेत.
११. जी मंगल कार्यालये याआधी भाडेतत्वावर दिलेले आहेत ते वगळून इतरांची निविदा प्रक्रिया करावी. निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत प्रचलित पध्दती नुसार भाडे आकारणी करण्यात यावी. याआधीचा सन २०१० चा सर्वसाधारण सभेचा ठराव क्रमांक १०३५ रद्द करण्यात येतो.
१२. लिजवर दिलेल्या जागा व नाल्याच्या लिजवरील जागा या प्रस्तावित केल्याप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करावी.
१३. संत एकनाथ व संत तुकाराम ही नाट्यगृहे खाजगीकरणबाबतचा विषय तुर्त बाजूला ठेवण्यात येतो.
१४. गॅन्ट्रीज हे प्रस्तावित केल्याप्रमाणे निवीदा पध्दतीने वसुलीची कार्यवाही करावी.निविदा प्रक्रिया अंतिम होईपर्यंत पुर्वीच्याच एजन्सी धारकाकडून जाहिरात कर वसुल करावा.
१५. शहर बसथांबे हे प्रस्तावित केल्याप्रमाणे जाहिराती करीता एजन्सी मार्फत ऑफर मागविण्यास मान्यता देण्यात येते. त्यामध्ये Face Lifting करणेसाठी तरतुद ठेवावी.

वरील दुरूस्तीसह प्रस्तावास मान्यता देण्यात येते वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७५४:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमधील मंजुर विकास योजनेनुसार विकसित करण्याची मोहिम जानेवारी २०१२ पासून महानगरपालिके तर्फे हाती घेण्यात आलेली आहे. या मोहिमे अंतर्गत सिटीचौक ते मच्छलीखडक गुलमंडी या १५.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यामध्ये काही बाधीत भाग भूधारकांनी स्वंयस्फूर्तीने रस्त्याने बाधीत क्षेत्र स्वतःहुन काढुन बाधीत क्षेत्र रस्त्यासाठी उपलब्ध करुन दिलेले आहे. अशा भूधारकास मावेजा देणेबाबत कार्यवाही सुरु आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ नुसार, विकास योजना रस्त्यामधील बाधीत भूधारकांना त्यांच्या बाधीत क्षेत्राचा मावेजा देण्यात येणार असल्याबाबत दैनिक वर्तमानपत्रातून **जाहीर प्रगटन** देण्यात आले होते. तसेच बाधीत भूधारकास वैयक्तिक सुचनापत्राद्वारे सुध्दा विनंती करण्यात आली होती. त्यानंतर बऱ्याच मिळकत धारकांसोबत बैठका घेऊन खाजगी वाटाघाटीनी भूसंपादनाबाबत प्रयत्न करण्यात आले. तथापि बरेच बाधीत भूधारकांनी यास प्रतिसाद न देता मावेजा बाबत मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.

शासनाचे परिपत्रक (क्र. महसुल व वन विभाग क्र. एलक्युएन/१८/२००४/प्र.क्र.१६२/अ-२ दिनांक ०६/०६/२००६) सार्वजनिक प्रयोजनासाठी भूसंपादन प्रकरणी भूसंपादन अधिनियमातील तरतुदीनुसार भूसंपादनास लागणारा कालावधी व त्यानंतरच्या पूढील न्यायालयीन प्रक्रिया टाळण्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही भूसंपादक संस्थेकडून खाजगी वाटाघाटीने खरेदी करणे

बाबत महानगरपालिकेने केलेल्या भूसंपादनाच्या आटोकाट प्रयत्नास यश आले नाही. तसेच मा. उच्च न्यायालयात दाखल याचिकेच्या सुनावणीत, कायदेशीर पध्दतीचा अवलंब करुन भूसंपादन करणे बाबत प्राप्त आदेशानुसार शहरातील सिटी चौक ते मच्छलीखडक गुलमंडी या १५.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यातील बाधीत मिळकतीचे भूसंपादन मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येत आहेत.

सिटीचौक, मच्छलीखडक व गुलमंडी हा शहरातील मध्य वस्तीतील व्यापारी बाजार पेठेचा मुख्य भाग आहे. तेथील विद्यमान अरुंद रस्त्यावरील वाढती वाहतुक समस्या, रहदारी इत्यादी बाबीचा विचार करता वाहतुकीस सुलभता व नियमितता प्राप्त होण्यासाठी उकत विकास योजना रस्त्याचे भूसंपादन हाती घेणे आवश्यक आहे. उक्त विकास योजना रस्त्यात बाधीत होणाऱ्या मालमत्तेचे संपादन मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद रिट पिटीशन क्र. २००२/२०१२, ६६८६/२०१२ व ६१७१/२०१२ मधील आदेशानुसार भूसंपादन कायदयातहत रितसर कार्यवाही करणेसाठी व त्यासाठी लागणाऱ्या खर्चाच्या मंजुरीसह प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :विकास योजना रस्त्यातील बाधीत मिळकतीचे भूसंपादन मा.जिल्हाधिकारी यांच्याकडून होण्यासाठी प्रस्ताव आहे चर्चेनंतर यास मंजूर करण्यात येते.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील सिटी चौक ते मच्छलीखडक गुलमंडी या १५.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्यातील बाधीत मिळकतीचे मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद रिट पिटीशन क्र. २००२/२०१२, ६६८६/२०१२ व ६१७१/२०१२ मधील आदेशानुसार संदर्भाधीन मिळकतीचे भूसंपादन अधिनियमाचे तरतुदीनूसार जिल्हाधिकारी यांचेकडून रितसर भुसंपानाची कार्यवाही करणेस व त्यासाठी लागणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७५५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यावरील ५००० पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम बिओटी तत्वावर मे. विनवॅाक सिस्टम्स इंक, नाशिक यांच्या कडुन करुन घेण्यांत येत असुन सदर कामाचा करार सात वर्षाचा होता. त्यांच्या कामाची मुदत दिनांक ६ मे २०१४ रोजी संपलेली आहे.

शहरातील पथदिव्यांचे नुतनिकरण (एल.ई.डी. पथदिवे) करण्याचे काम हाती घेण्यांत आले होते परंतु सदर कामाची निविदा मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने पथदिवे नुतनीकरणाचे काम करता आलेले नाही. शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम हे अत्यावश्यक असल्याने काम बंद न करता मे.विनवॅाक सिस्टम्स इंक याच एजन्सीकडुन निविदा अटीनुसार करुन घेण्यांत येत असुन, त्यांना माहे ऑक्टोबर २०१४ ते माहे जुन २०१५ पर्यन्त मुदतवाढ देण्यासाठी तसेच सदर कामावर मुदतवाढ नंतर होणा-या खर्चास रक्कम रु. १,१२,५०,०००/- (रु एक कोटी बारा लक्ष पन्नास हजार मात्र) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च लेखाशिर्षक विद्युत खर्च रस्त्यावरील दिवे मधुन करण्यांत येणार आहे

दरम्यानच्या काळात शहरात एल.ई.डी. पथदिवे लावण्याच्या कामासंबंधी मा. सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेने काढलेल्या निविदे बाबत जो वाद (SLP No ३४/२९-

१३१३०/२०१४) सुरु आहे. त्याबाबत महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामाचा करार रद्द करण्यांच्या अटीवर मे.विनवॅाक सिस्टम्स इंक यांना या कामासाठी मुदतवाढ देण्यांत येईल.

करीता शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्तीचे कामास माहे जुन २०१५ पर्यत मुदतवाढ व या कामावर होणा-या रु. १,१२,५०,०००/- खर्चास मान्यतेचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :एलईडी लाईटचा विषय आहे. मुदत संपलेली आहे ती वाढवून देत आहोत तो विषय मंजूर करीत आहे.

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील मुख्य रस्त्यावरील ५००० पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम बिओटी तत्वावर मे.विनवॅाक सिस्टम्स इंक, नाशिक यांना दिलेले असून यांच्या कामाची मुदत दिनांक ६ मे २०१४ रोजी संपलेली आहे.शहरात एल.ई.डी.पथदिवे लावण्याच्या कामासंबधी मा. सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेने काढलेल्या निविदे बाबत मा.न्यायालयाचे महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामाचा करार रद्द करण्यांच्या अटीवर माहे जुन २०१५ पर्यत या एजन्सीला मुदतवाढ देण्यास व या कामावर होणाऱ्या रक्कम रु. १,१२,५०,०००/- (रु एक कोटी बारा लक्ष पन्नास हजार मात्र) खर्च लेखाशिर्षक विद्युत खर्च रस्त्यावरील दिवे मधुन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७५६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद शहरातील सिडको व शहर भागातील मुख्य रस्त्यावरील ४५०० पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम बिओटी तत्वावर मे. विनवॅाक सिस्टम्स इंक, नाशिक यांच्या कडुन करुन घेण्यांत येत असुन सदर कामाचा करार सात वर्षाचा होता. त्यांच्या कामाची मुदत दिनांक ३१ जाने २०१५ रोजी संपलेली आहे.

शहरातील पथदिव्यांचे नुतनिकरण (एल.ई.डी. पथदिवे) करण्याचे काम हाती घेण्यांत आले होते. परंतु सदर कामाची निविदा मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने पथदिवे नुतनीकरणाचे काम करता आलेले नाही. शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम हे अत्यावश्यक असल्याने काम बंद न करता मे.विनवॅाक सिस्टीम इंक यांच्याकडुन निविदा अटीनुसार करुन घेण्यांत येत असुन त्यांना माहे फेब्रुवारी २०१५ ते माहे जुन २०१५ पर्यन्त मुदतवाढ देण्यासाठी तसेच सदर कामावर मुदतवाढ नंतर होणा-या खर्चास रक्कम रु. ६१,५२,५००/- (रु एकसष्ठ लक्ष बावन्न हजार पाचशे मात्र) प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर कामाचा खर्च लेखाशिर्षक विद्युत खर्च रस्त्यावरील दिवे मधुन करण्यांत येणार आहे

दरम्यानच्या काळात शहरात एल.ई.डी.पथदिवे लावण्याच्या कामासंबधी मा. सर्वोच्च न्यायालयात महापालिकेने काढलेल्या निविदे बाबत जो वाद (SLP No ३४/२९-१३१३०/२०१४) महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामाचा करार रद्द करण्याच्या अटीवर मे विनवॅाक सिस्टम्स इंक यांना या कामासाठी मुदतवाढ देण्यांत येईल.

करीता शहरातील पथदिवे देखभाल दुरुस्तीचे कामास माहे जुन २०१५ पर्यत मुदतवाढ व या कामावर होणा-या वाढीव रु.६१,५२,५००/- च्या खर्चास मान्यता देण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :एलईडी लाईटचा विषय आहे मुदत संपलेली आहे ती वाढवून देत आहोत तो विषय मंजूर करीत आहे.

**ठराव :-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको व शहर भागातील मुख्य रस्त्यावरील ४५०० पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती करण्याचे काम बिओटी तत्वावर मे.विनवॅाक सिस्टम्स इंक, नाशिक यांच्या कडुन करुन घेण्यांत येत असुन कामाची मुदत संपल्याने व एल.ई.डी.पथदिवे लावण्याच्या कामासंबधीच्या निविदेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे महापालिकेच्या बाजूने अनुकूल निर्णय आल्यास पथदिवे देखभाल दुरुस्तीच्या कामाचा करार रद्द करण्याच्या अटीवर मे विनवॅाक सिस्टम्स इंक यांना पुढील कामासाठी माहे जुन २०१५ पर्यत मुदतवाढ देण्यास व या कामावर होणा-या रक्कम रुपये ६१,५२,५००/- च्या वाढीव खर्च हा लेखाशिर्षक विद्युत खर्च रस्त्यावरील दिवे मधुन करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कायर्वाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५७:-**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, औरंगाबाद सेफ सिटी प्रोजेक्ट राबविण्याच्या दृष्टीने दिनांक १६.०१.२०१५ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे सभागृहात मा. गृहराज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद, मा. पोलीस आयुक्त, महानगरपालिका आयुक्त, पोलीस अधिक्षक, औरंगाबाद (ग्रामीण) यांच्या समवेत बैठक संपन्न झाली. बैठकीतील चर्चेनुसार औरंगाबाद शहर हे महाराष्ट्रातील पाचव्या क्रमांकाचे शहर असुन, औरंगाबाद शहरातील वाळुज, चिकलठाणा, शेंद्रा, पैठण एमआयडीसी सारख्या औद्योगीक वसाहतीमुळे औरंगाबाद शहराच्या लोकसंख्या वाढीचा दर देशाच्या सरासरी वाढीपेक्षा दुपटीपेक्षा जास्त आहे. यामुळे गुन्हेगारीत होणारी वाढ, वाढणारे अपघात, वाहतुकीच्या सुरक्षेचा व देशाला भेडसावणारा दहशतवादाचा धोका इत्यादीचा सामना करण्यासाठी नविन तंत्रज्ञानाची मदत घेण्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. त्यादृष्टीने शहरात औरंगाबाद सेफ सिटी प्रकल्प मा. पोलीस आयुक्त कार्यालयातर्फे आणि महानगरपालिकेच्या सहकार्याने राबविण्याचा निर्णय झाला असून, त्याचे विवरण खालील प्रमाणे.

१. औरंगाबाद सेफ सिटी प्रकल्प राबविण्याकरीता महानगरपालिका, औरंगाबाद यांचेकडे सदर प्रकल्प उभारणीचे काम सोपविण्याचा निर्णय झाला.
२. प्रकल्पासाठी लागणारा निधी डि. पी. डी. सी. मार्फत पुरविण्यात येईल असे ठरले.
३. या प्रकल्पाकरीता तांत्रिक सल्लागाराची (Consultant) नेमणुक करुन पुढील कार्यवाही करावी असे ठरले.
४. प्रोजेक्टकरीता पोलीस खात्यातर्फे समन्वयक (Co-ordinator) म्हणुन पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) हे राहील असे ठरले.

या प्रकल्पा अंतर्गत शहरात आवश्यक त्या ठिकाणी (अ) सि. सी. टि. व्ही. कॅमेरे बसविणे (ब) पब्लिक ॲड्रेस सिस्टीम (क) आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा (ड) व्हेईकल ट्रॅकींग सिस्टीम (इ) कम्युनिकेशन सिस्टीम (दळणवळण) (फ) कंमांड कंट्रोल रुम उभारणे इ. वाहतुक सुरक्षेच्या दृष्टीने उपाय योजना करण्याचा समावेश आहे. सदर कामे महानगरपालिका मा.पोलीस आयुक्त यांच्या कार्यालयाशी योग्य समन्वय ठेऊन दोन टप्प्यामध्ये पुर्ण करणार असून, यामध्ये पहिल्या टप्प्यात रु. २.०० कोटी व दुस-या टप्प्यामध्ये साधारणपणे रु. १०.०० कोटी खर्च अपेक्षीत आहे. या कामासाठी लागणारा संपुर्ण निधी जिल्हा नियोजन विकास समिती (डि.पी.डी.सी) मार्फत प्राप्त होणार आहे. त्यानुसार औरंगाबाद सेफ सिटीचा डि. पी. आर.

तयार करणेसाठी महानगरपालिकेतर्फे जाहिर निविदा मागवून प्रकल्पाच्या तांत्रीक सल्लागाराची नियुक्ती करणे प्रस्तावीत आहे.

तरी उक्त प्रमाणे औरंगाबाद सेफ सिटी अंतर्गत करावयाच्या कामांसाठी पहिल्या टप्प्यात प्राप्त होणारा निधी रु. २.०० कोटी आणि दुस-या टप्प्यातील प्राप्त होणारा रु. १०.०० कोटी असा एकुण रक्कम रु. १२.०० कोटीच्या कामास मान्यता व्हावी तसेच सदर प्रकल्प राबविण्यासाठी जाहीर निविदा मागवून प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्याबाबत मंजुरीचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविणेचा विषय आहे मंजूर करण्यात येते.
ऐनवेळचे विषय मंजूर

**<u>ठराव :-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद सेफ सिटी अंतर्गत प्रस्तावीत अ, ब, क, ड, इ, फ प्रमाणे २ टप्प्यात करावयाच्या कामांसाठी पहिल्या टप्प्यात प्राप्त होणारा निधी रु. २.०० कोटी आणि दुस-या टप्प्यातील प्राप्त होणारा रु. १०.०० कोटी असा एकुण रक्कम रु. १२.०० कोटीच्या कामास मान्यता देण्यात येते. तसेच सदर प्रकल्प राबविण्यासाठी नियमानुसार जाहीर निविदा मागवून प्रकल्पाच्या तांत्रिक सल्लागाराची नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद